तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

www.lokshahilive.com

जळगाव ■ अंक – १३८ ■ गुरुवार, दि.२८ मार्च २०२४ | संपादिका : सौ. शांता वाणी | ■ पाने ४ ■ किंमत ३ रु. ■ RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | lokshahilive@gmail.com

### सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : ६६,५२०
- चांदी (प्रति १ किलो): ७४,५७०

### तापमान

- कमाल : ३७ अंश सेल्सिअस
- किमान : २० अंश सेल्सिअस

### महत्वाचे

**पोलीस भरती अर्जाची १५ एप्रिल पर्यंत मुदतवाढ**

**जळगाव :** पोलीस शिपाई संवर्गातील पदांसाठी ३१ मार्च पर्यंत अर्ज सादर करण्यासाठी महाआयटी यांच्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतु राज्य शासनाने नुकतेच मराठा आरक्षण विधेयक संमत केले आहे. त्यासाठी उमेदवारांना लागणारे एसईबीसी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्यामुळे सर्व उमेदवारांना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ एप्रिल, २०२४ पर्यंत करण्यात येत आहे. अंतिम दिनांकापुर्वी उमेदवारांना तांत्रिक अडचणींमुळे प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्यास प्रमाणपत्र अर्जाची पोचपावतीसह अर्ज सादर करावा. मात्र कागदपत्र पडताळणीवेळी विहित नमुन्यातील सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. असे आवाहन राजकुमार व्हटकर, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई यांनी केले आहे.

**शहरात पाणी पुरवठा एक दिवस उशिराने**

**जळगाव :** शहरातील वाघुर पंपींग व उमाळा जलशुध्दीकरण केंद्र विद्युत वाहीनी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी यांचेकडून एमआयडीसी-२ भागात स्थलांतरीत करणेचे काम हाती घेणार आहेत. दरम्यान दि. २८/०३/२०२४ रोजी अनुषंगिक कामे करावयाची असल्याने जळगांव शहराचा पाणी पुरवठा एक दिवस पुढे ढकलण्यांत आला आहे.
दि.२८/०३/२०२४ रोजीचा पाणी पुरवठा दि.२९/०३/२०२४ रोजी करण्यांत येईल.
तसेच दि.२९/०३/२०२४ रोजी व ३०/०३/२०२४ रोजीचा पाणी पुरवठा अनुक्रमे दि.३०/०३/२०२४ व ३१/०३/२०२४ रोजी करण्यात येईल. तरी नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अमरावतीत भाजपाकडून नवनीत राणांना उमेदवारी

## लोकसभा उमेदवारांची सातवी जादी जाहीर : पक्ष आणि एनडीएतील मित्रपक्षांचा विरोध झुगारून भाजपातर्फे राणांना तिकीट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमरावती** प्रतिनिधी

खासदार नवनीत राणा या बनावट जातप्रमाणपत्र सादर करून अमरावतीची लोकसभा निवडणूक लढल्याचा त्यांच्यावर आरोप होत आहे. अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने राणा यांचं जातप्रमाणपत्र रद्द करावं असा निर्णय दिला आहे. परंतु, या निर्णयाला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आवाहन दिलं. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या राणा यांच्या याचिकेवरील निकाल सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला आहे. या जातप्रमाणपत्राच्या प्रकरणामुळे राणा यांच्या उमेदवारीसमोर अडचणी येत होत्या. त्याचबरोबर नवनीत राणा कोणत्या पक्षाकडून लोकसभा निवडणूक लढवणार याबाबत संभ्रमाचं वातावरण होतं. मागील लोकसभा निवडणुकीत (२०१९) नवनीत राणा या राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत उमेदवार होत्या. त्यावेळी त्यांनी शिवसेनेचे तेव्हाचे खासदार आनंदराव अडसूळ यांचा पराभव केला होता. यावेळी नवनीत राणा या भाजपाच्या तिकीटावर अमरावतीची लोकसभा निवडणूक लढण्यास इच्छूक होत्या. परंतु, त्यांना शिवसेनेकडून आणि भाजपाच्या इतर मित्रपक्षांकडून



विरोध होत आहे. त्यामुळे नवनीत राणा यांच्या उमेदवारीबाबत साशंकता व्यक्त केली जात होती. अखेर पक्ष आणि एनडीएतील मित्रपक्षांचा विरोध झुगारून भाजपाने नवनीत राणा यांना अमरावतीतून लोकसभेचं तिकीट दिलं आहे. भाजपाने लोकसभा उमेदवारांची सातवी जादी जाहीर केली असून यामध्ये नवनीत राणा यांचं नाव आहे. नवनीत कौर राणा यांना अमरावतीत शिवसेनेकडून विरोध होत होता. तसेच येथील माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनीदेखील राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. राणा यांना उमेदवारी मिळाल्यास आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही, अशी ठाम भूमिका अडसूळ यांनी घेतली होती. अमरावतीमधील एनडीएतील मित्रपक्ष असलेल्या प्रहार जशक्ती पार्टीचे प्रमुख बच्चू कडू यांचाही राणा यांना विरोध आहे. अशा परिस्थितीत राणा यांना भाजपाकडून उमेदवारी मिळणार की नाही यावर प्रश्नचिन्ह होतं. परंतु, भाजपाने राणा यांना अमरावतीतून लोकसभेची उमेदवारी दिली आहे. भाजपाने काही वेळापूर्वी लोकसभा उमेदवारांची सातवी यादी जाहीर केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील अमरावतीतून नवनीत राणा यांना तर कर्नाटकच्या चित्रदूर्गमधून गोविंद करजोल यांना उमेदवारी दिली आहे. बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. ते म्हणाले, आमच्या सर्व कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की ज्या नवनीत राणाने आम्हाला अपमानित केलं त्यांचा प्रचार आम्ही करणार नाही. कार्यकर्त्यांची मानसिकताच नाही. राजकारणात झीरो झालो तरीही चालेल पण इतकी शरणागती पत्करणार नाही. काहीही झालं तरीही राणांचा प्रचार करायचा नाही ही कार्यकर्त्यांची मानसिकता आहे. नवनीत कौर-राणा या चित्रपट अभिनेत्री होत्या. यांनी बडनेराचे आमदार रवी राणा यांच्याशी २०११ मध्ये विवाह केला. त्यानंतर त्यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळवले होते.

# बच्चू कडू आणि आनंदराव अडसूळ आक्रमक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमरावती** प्रतिनिधी

खासदार नवनीत राणा यांना भाजपकडून अधिकृतपणे अमरावती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर झाली आहे. पण याला महायुतीमधील मित्रपक्षांचा तीव्र विरोध असल्याचं बघायला मिळत आहे. आमदार बच्चू कडू आणि शिवसेनेचे माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. आपण नवनीत राणा यांचं काम करणार नाही. याउलट नवनीत राणा यांचा कसा पराभव होईल, यासाठी आपल्याकडून प्रयत्न केला जाईल, असं या



दोन्ही नेत्यांनी म्हटलं आहे. नवनीत राणा यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बच्चू कडू आणि आनंदराव अडसूळ या दोन्ही नेत्यांनी आपली भूमिका मांडली. बच्चू कडू आणि आनंदराव अडसूळ यांचा सुरुवातीपासून नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध आहे. तर दुसरीकडे आमदार रवी राणा यांनी या दोन्ही नेत्यांबद्दल मोठा दावा केला होता. बच्चू कडू आणि आनंदराव अडसूळ या नवनीत राणा जिंकून याव्यात यासाठी प्रचार करतील, असं रवी राणा म्हणाले होते. नवनीत राणा यांना भाजपकडून उमेदवारी मिळाल्यानंतर बच्चू कडू यांना रवी राणा यांच्या वक्तव्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. नवनीत राणा यांना भाजपकडून उमेदवारी मिळाली आहे. त्यामुळे तुम्ही राणांच्या वक्तव्यानुसार त्यांचा प्रचार करणार का? असा प्रश्न बच्चू कडू यांना विचारला असता "त्यांच्या बापाची जाहागिरी थोडीय", अशा शब्दांत त्यांनी उत्तर दिलं. "आमचा विरोध कायम आहे. आम्ही कायम विरोध करु. आम्ही केल्या तक्रारीचा काही उपयोग झाला नाही. आम्ही आता बघू, एकंदरीत काय रणनीती आहे त्यापद्धतीने उमेदवार द्यायचा का, याबाबत निर्णय घेऊ. आम्ही नवनीत राणा यांचा शंभर टक्के प्रचार करणार नाहीत. नवनीत राणा यांच्यासाठी ही लढत तेवढी सोपी राहणार नाही. याचा रिझल्ट नक्कीच दिसेल. आम्ही नवनीत राणा यांना शंभर टक्के पाडणार", असं बच्चू कडू यांनी म्हटलं. "आम्ही आता विरोधात प्रचार करुन त्यांना महायुतीत ठेवायचं किंवा न ठेवायचं हा त्याचा प्रश्न आहे", असंही बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं. "आता काम सरो वैद्य मरो अशी अवस्था आहे. त्यांना असं वाटतंय की आमची काही गरज नसेल तो त्यांचा प्रश्न आहे.

# ईडीने जप्त केलेली संपत्ती गरिबांमध्ये वाटणार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पश्चिम बंगाल** प्रतिनिधी

मागील काही वर्षांपासून ईडीने मोठ्या प्रमाणावर धाडी टाकून कारवाई केली आहे. यावरून विरोधक नेहमी केंद्र सरकारवर टीका करतात. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल एक मोठे वक्तव्य केले. पश्चिम बंगालमधील गरिबांकडून लुटलेला आणि अंमलबजावणी संचालनालयाने जप्त केलेला पैसा लोकांना परत करणार, असे वक्तव्य पीएम मोदींनी केले आहे. कृष्णनगर लोकसभा मतदारसंघात तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा यांच्या विरोधात भाजपने राजघराण्यातील सदस्य अमृता रॉय यांना उमेदवारी दिली आहे. काल



पीएम मोदींनी अमृता यांच्याशी फोनवरुन संवाद साधला. यावेळी पीएम मोदी म्हणाले, ईडीने पश्चिम बंगालमध्ये ३००० कोटी रुपये जप्त केले आहेत. हा गरिबांचा पैसा आहे. कोणी शिक्षक होण्यासाठी पैसे दिले, तर कोणी कारकून होण्यासाठी पैसे दिले. माझी इच्छा आहे की, नवीन सरकार बनताच गरीब जनतेचा पैसा त्यांना परत केला जावा. यासाठी मी कायदेशीर सल्ला घेतोय. बंगालच्या लोकांनी विश्वास ठेवावा की, ईडीने जप्त केलेले ३००० कोटी रुपये परत करण्यासाठी भाजप सरकार काही ना काही मार्ग शोधेल. पंतप्रधान मोदी आणि अमतृा रॉय यांच्यातील चर्चेची माहिती देताना भाजप नेत्यांनी सांगितले की, राज्यात नोकऱ्या देण्यासाठी तृणमूलने सुमारे ३,००० कोटी रुपये लाटले. पंतप्रधान मोदींनी राजमाता अमृता रॉय यांना सांगितले की, भ्रष्टाचाऱ्यांनी सर्वसामान्यांचा पैसा लुटला आहे, सध्या हा पैसा ईडीकडे आहे. तो गरीब जनतेला परत केला पाहिजे. यासाठी ते कायदेशीर पर्याय शोधत आहे. एकीकडे भाजप देशातून भ्रष्टाचार उखडून टाकण्यासाठी कटिबद्ध आहे.

# पारोळ्यात संयुक्त विद्यमाने पाणपोईचे उद्घाटन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** वृत्तसंस्था

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या बीज सोहळ्यानिमित्त येथील श्री संत तुकाराम महाराज कुणबी पाटील समाज व सद्गुरु महिला उद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने संत तुकाराम महाराज यांना करून पाणपोई चे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी कुणबी पाटील समाजाचे पंच संजय पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात श्री संत तुकाराम महाराज यांच्या कार्याविषयी तसेच कुणबी पाटील समाज यांच्याकडून होत



असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी समाजाचे जेष्ठ पदाधिकारी देविदास पाटील यांनी श्री संत तुकाराम महाराज यांच्या विविध ओळीतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची माहिती सांगितली या अभिवादन कार्यक्रमास कुणबी पाटील समाजाचे अध्यक्ष देवेंद्र पाटील, सचिव शिवाजी गाडीवान, पंडित पाटील समाजाचे ज्येष्ठ पदाधिकारी दिलीप पाटील, पत्रकार प्रतीक मराठे, सद्गुरू महिला उद्योगाच्या अध्यक्षा सुवर्णा पाटील यांच्यासह महिला व पदाधिकारी

पान २ वर »

# घडणाऱ्या घटनांवर शरद पवार नाराज : सूत्र

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** वृत्तसंस्था

ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपावरुन झालेल्या वादावर राष्ट्रवादी शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या अंतर्गत बैठकीत शरद पवार यांनी याबाबत नाराजी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शरद पवार गटाची काल ससंदीय बैठक पार पडली. या बैठकीत शरद पवारांनी नाराजी व्यक्त केली. "महाविकास आघाडीतील इतर घटक पक्ष आघाडी धर्माचं पालन करताना दिसत नाहीत. काँग्रेस आणि ठाकरे गटाने आघाडी धर्माचं पालन केलं नाही", असं शरद पवार बैठकीत म्हणाल्याची माहिती सूत्रांनी दिली. "महाविकास आघाडीला संयुक्त पत्रकार परिषद घेऊन एकत्र जागावाटपाची घोषणा जाहीर करायला हवी होती. महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांना एकत्रितपणे समोर यायला हवं होतं आणि एकत्र पत्रकार परिषद घ्यायला हवी होती", असं शरद पवारांनी म्हटलं. "जागावाटपावर चर्चा सुरु होती तर महाविकास आघाडीच्या इतर घटक पक्षांनी वेगवेगळ्या जागांची घोषणा का केली?", असा प्रश्न शरद पवारांनी बैठकीत उपस्थित केला.

# आणखी पाच लाख टन कांद्याची होणार आयात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** वृत्तसंस्था

उन्हासोबत महागाईच्या झळा सोसणाऱ्या सर्वसामान्यांना लवकरच दिलासा मिळू शकतो. केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदीचा आदेश अनिश्चित काळासाठी वाढवला आहे. निर्यातबंदीचा आदेश पूर्वी ३१ मार्च रोजीपर्यंत होता. सरकार कांद्याच्या किंमती नियंत्रीत ठेवण्यासाठी शेतकऱ्यांकडून बफर स्टॉकसाठी लाखो टन कांद्याची खरेदी करणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला आशा आहे की, कांद्याच्या किंमती कमी होतील. बफर स्टॉकसाठी केंद्र सरकार शेतकऱ्यांकडून ५ लाख टनांहून अधिकचा कांदा खरेदी करणार आहे. सरकारने नाफेड आणि एनसीसीएफला रब्बी हंगामातील कांदा खरेदी सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत. मीडियातील वृत्तानुसार, ग्राहक मंत्रालयाच्या सचिवानुसार, एक ते दोन दिवसांत ही खरेदी सुरु होईल. कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेतला होता. ३१ मार्च रोजी त्याची अंतिम मुदत समाप्त होणार होती. लोकसभेच्या सार्वत्रिक



निवडणुका जवळ आल्याने सरकारने पुढील आदेशापर्यंत निर्यातबंदी लागू ठेवली. शरद पवार गटासह इतर काही पक्षांनी या निर्णयावर सवाल उपस्थित केला आहे. गेल्यावर्षी बफर स्टॉक तयार करणे आणि आवश्यकतेनुसार बाजारात हा माल उतरविण्यासाठी जवळपास ६.४ लाख टन कांदा नाफेड आणि एनसीसीएफने खरेदी केला होता. सातत्याने कांदा खरेदी सुरु असल्याने शेतकऱ्यांना त्याचे चांगले दाम मिळाल्याचा दावा करण्यात येत आहे. यामध्ये सरासरी १७ रुपये किलो असा भाव होता. सध्या हा स्टॉक जवळपास संपला आहे. सध्या महाराष्ट्रातील बाजारपेठांमध्ये कांद्याची किरकोळ किंमत १४-१५ रुपये किलो आहे. गेल्यावर्षीपेक्षा ही किंमत जवळपास दुप्पट आहे. कृषी मंत्रालयानुसार, यावेळी रब्बी हंगामात कांदाचे उत्पादन १९०.५ लाख टन होईल, असा अंदाज आहे. गेल्यावर्षीच्या २३७ लाख टनापेक्षा कांद्याच्या उत्पादनात २०% घसरण दिसून आली आहे.



*सावदा नगरपरिषद येथे काल धडक वसुली मोहीम सुरु करण्यात आली. त्यात लेखापरीक्षक भारती पाटील, पाणीपुरवठा अधिकारी जितेश पाटील, संदीप पाटील, विमलेश जैन, संदीप वाणी, हमीद तडवी, कार्तिक ढाके, अवी पाटील आदी.*

# महानगरपालिकेत कार्यरत शिक्षकांची बैठक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अंतर्गत स्वीप मतदान जनजागृती कार्यक्रमासाठी काल दिनांक २७. ०३. २०२४ रोजी जळगाव महानगरपालिकेच्या सभागृहात महानगरपालिकेत कार्यरत शिक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यात ज्या शिक्षकांना बीएलओची कामकाज दिलेले नाही अशा प्राथमिक शाळेच्या शिक्षकांना



त्यांच्या शाळेतील परिसरात तसेच शाळेमधील विद्यार्थ्यांचे पालक यांचे प्रबोधन करणे मतदान करण्यासाठी प्रवृत्त करणे शाळेच्या परिसरामध्ये मीटिंग घेणे मतदारांच्या जास्तीत जास्त घरापर्यंत पोहोचून मतदान जनजागृती बाबत माहिती देणे इत्यादी प्रकारचे कार्यक्रम घेण्याबाबत शिक्षकांना सूचना देण्यात आल्या. सदर बैठकीस १३० शिक्षकांनी उपस्थिती नोंदवली यावेळी

पान २ वर »

# आंबेडकरांची जरांगेसोबत नवी आघाडी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अकोला** प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले असून राज्याच्या राजकारणात अनेक नवीन घडामोडी घडत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबडेकरकाल यांनी थेट मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्यासोबत नवी आघाडी केली आहे.काल प्रकाश आंबेडकर यांनी काल पत्रकार परिषद घेतली. नव्या आघाडीची घोषणा केली. दुसरीकडे प्रकाश आंबडेरांनी जरांगेसोबत आघाडी केल्यानं ते महाविकास आघाडीतून बाहेर



पडत असल्याच्या शक्यतांवर शिक्कामोर्तब झाला आहे. वंचित बहुजन आघाडीच्यावतीनं भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नागपुरातील उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. वंचित बहुजन आघाडी सांगलीतून प्रकाश शेंडगे (ओबीसी बहुजन पार्टी) यांना उमेदवारी दिल्यास त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, नागपुरात वंचित काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरेंना जाहीर पाठिंबा देणार असल्याची घोषणा प्रकाश आंबेडकरांनी केली आहे. तसेच, राज्यातील सात जागांसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे. तर, रामटेकमधील उमेदवाराचा

**वंचितची पहिली उमेदवार यादी जाहीर**

भंडारा-गोंदिया : संजय केवट
गडचिरोली : हितेश पांडुरंग मडावी
चंद्रपूर : राजेश बेले
बुलडाणा : वसंतराव मगर
अकोला : प्रकाश आंबेडकर
अमरावती : प्राजक्ता पिल्लेवान
वर्धा : प्रा. राजेंद्र साळुंके
यवतमाळ-वाशिम : खेमसिंह पवार

निर्णय काल संध्याकाळपर्यंत होईल. प्रकाश आंबेडकरांनी एकूण ७ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये प्रामुख्यानं अकोला, भंडारा-गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, बुलडाणा, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम या मतदारसंघांचा समावेश आहे. तसेच, मनोज जरांगे त्यांच्या उमेदवारांबाबत ३० मार्चनंतर निर्णय घेतील असंही आंबेडकरांनी सांगितलं. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "काल राज्य कार्यकारिणीची बैठक झाली त्यात काही निर्णय

पान २ वर »

# टाकरखेडा येथे विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जामनेर** वृत्तसंस्था

तालुक्यातील टाकरखेडा येथे श्री विठ्ठल रुक्मिणी तसेच गरुड, हनुमंत मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज पर्यटन विकास मंत्री ना. गिरीश महाजन यांचे हस्ते तसेच माजी नगराध्यक्षा साधना महाजन, सेवानिवृत्त अभियंता जे. के. चव्हाण, मा. जि. प. महिला व बालकल्याण सभापती रजनी चव्हाण, शिक्षण संस्थेचे सचिव जितेंद्र रमेश पाटील, नगरसेविका संध्या पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



ह. भ. प. श्री गुरुवर्य रवींद्र महाराज हरणे( मुक्ताई संस्थान) यांच्या मार्गदर्शनाखाली २५ मार्च रोजी दुपारी चार वाजता मूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली. संध्याकाळी सात वाजता जलाधिवास, रात्री ह. भ. प. गुरुवर्य निवृत्ती महाराज कोळंबे (हरणखेडा )यांचे कीर्तन संपन्न झाले २६ मार्च रोजी सकाळी ध्यानधिवास, पिठाची पूजा, पुण्य वाचन, दुपारी हवन, संध्याकाळी पुण्याधीवास, रात्री निद्रावास व ह. भ. प. विजय महाराज खवले (मोताळा )यांचे दुसरे कीर्तन संपन्न झाले. २७ मार्च रोजी सकाळी स्नपण, रूपदर्शन प्राणप्रतिष्ठा व पूर्णाहुती तसेच रात्री ह. भ. प. गुरुवर्य

पान २ वर »

जळगांव 0257 - 2237491, 2241491, 9422775011, ठाणे मुंबई - 9422284511 | नासकि, 9890525925 | lokshahilive@gmail.com, lokshahi@hotmail.com

पान ५ वरून

## जलशुद्धीकरण केंद्रातून...

उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याने सदरचे व्हाल चोरले असून त्याचे ताब्यातून एक लोखंडी व्हॉल व एक लोखंडी रिटर्न व्हॉल असा एकूण एक लाख तिस हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला, आज दि. २७ मार्च रोजी न्यायालयाने त्याची रवानगी बुलढाणा जिल्हा कारागृहात केली आहे.

## धानोरा ते प्रेरणापीठ पिराणा...

ठिकाणापासुन अनेक जण जोडले जातात. आणी व्यापक स्वरुप होत जाते. पदयात्रेत दररोज सकाळ संध्याकाळ महाआरती, प्रभातीपुजा, इमामशहा महाराजांचा सत्संग होतो. अनेक भाविक या पदयात्रींना स्नेहभोजन देत असतात. या पदयात्रेत फैजपुर, धानोरा, चोपडा, जांभोरा, शेंदुर्णी, शिरपुर, शहादा, तळोदा, कुकरमुंडा, डेडीयापाडा, राजपिपला येथील भाविक जोडले जावुन पदयात्राचे स्वरुप मोठे होत जाते. या वर्षी जाणाऱ्या पदयात्रेची संख्या ८० स्त्रीया, पुरुष, तरुण, तरूणी, अबालवृध्द या सर्वांचाच समावेश आहे. ही पदयात्रा १५ दिवसाची आहे. महामंडलेश्वर १००८ श्री स्वामी जनार्दन हरिजी महाराज, सर्वसमन्वय मुखी महाराज सतपंथ ज्योत मंदिर अध्यक्ष गजानन चौधरी, सतपंथ ज्योत मंदिरचे सर्व संचालक, सतपंथ चारिटेबल ट्रस्टचे उपाध्याक्ष माणिकचंद महाजन, विजय मुखी, धनराज मुखी ईश्वर मुखी, कमलाकर मुखी, कशरलाल मुखी, धनराज चौधरी तसेच सतपंथ ज्योत मंदिर धानोरा, फैजपुर संस्थानचे सर्व कार्यकर्ते यांचे मोलाचे सहकार्य लाभत असते.

## मानव अधिकार व महिला...

समाजसेवेचा कार्याचा गौरव केला व मानव अधिकार संघटनेची कार्यप्रणाली समजावून सांगितली व महिला कार्यकारणी सुद्धा लवकरच करण्यात येईल असे पदाधिकाऱ्यांना सुचित केले. तालुका अध्यक्ष भास्कर मिस्तरी कार्याध्यक्ष बी. डी. गवई उपाध्यक्ष जगन्नाथ चांगदेवकर यांनी मनोगत व्यक्त केले. त्यात म्हणाले की मुक्ताईनगर तालुक्यात संघटनेच्या माध्यमातून मानवाचे अधिकार व नागरिकांची सनद या विषयी सविस्तर माहिती देऊन न्याय व हक्कापासून कोणीही वंचित राहणार नाही. तसेच अंध अपंग दिव्यांग बांधवांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य शासकीय योजनांचा लाभ देण्यात येईल असे सांगितले. प्रसंगी रामदास मिस्तरी हेट संपर्क अधिकारी विजय खराटे संपर्क अधिकारी हकीम चौधरी सचिव धनंजय सापधरे संघटक पंकज वंजारी उपसचिव चंद्रकांत रावाये संघटक आधी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन तालुका अध्यक्ष भास्कर मिस्तरी यांनी केले.

## संजय गांधी निराधार...

कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दाखल केलेले होते. परंतु सन २०२२-२३ चे अनेक प्रस्ताव गत् काही महिन्यांपासून प्रशासकीय स्तरावर धूळखात पडलेले असल्याने अनेक पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या या अनुदानापासून वंचित रहावे लागत होते. याबाबत कलीम शेख यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांचेसह आदींकडे पाठपुरावा केला. परंतु संजय गांधी निराधार विभागात काही वर्षापासून ठाण मांडून बसलेल्या एका अधिकाऱ्यांने गरजू निराधारांना त्रास देण्याच्या उद्देशाने की काय त्यांच्या प्रकरणांचा निपटाराच केला नाही. त्यामुळे या सर्व प्रकरणी ३० जानेवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना या सर्व प्रकाराची माहिती निवेदनाद्वारे दिली होती व जिल्हाधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला. त्यानंतर मलकापूर प्रशासकीय स्तरावर व प्रलंबित असलेल्या केसेसचा निपटारा करण्यासाठी हालचालींना वेग आला होता व सन २०२२-२३ च्या प्रलंबित असलेल्या ४०० केसेसचा निपटारा तातडीने १ फेब्रुवारी २४ रोजी करण्यात आला. तर सन२०२४ ह्य वर्षात अंदानज ४०० लाभार्थ्यांना दिलासा मिळाला रहिलेले काहि प्रकरण असल्यस संजय गांधी विभागाचे नाएब तहसिलदार श्रीकूष्ण उगले यांनी सागीतले की त्यांना पण न्याय मिळेल.

## आंतरराष्ट्रीय फ्लोअरबॉल...

जल्लोष स्वागत करून त्यांच्या सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या संस्थेचे प्रतीकशेट नाईक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी व्ही दलाल, उपप्राचार्य तथा क्रीडा समन्वयक प्रा एस यु पाटील, उपप्राचार्य प्रा एस डी धापसे, खेळाडूंचे मार्गदर्शक तथा महाविद्यालयाचे क्रीडासंचालक प्रा उमेश पाटील तसेच प्रा सत्यशील धनले सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व क्रीडाप्रेमी यांनी सदर खेळाडूंचे सत्कार व स्वागत केले.

## "बौद्धिक संपदा हक्क ...

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सतिश एन. वैष्णव यांनी केले त्यात त्यांनी बौद्धिक संपदा हक्क याची प्रासंगिकता तसेच त्याची व्याप्ती या विषयी माहिती देऊन हे परिसंवादात सहभागी मान्यवरांना तसेच विद्यार्थ्यांना कश्या प्रकारे उपयोगी ठरणार आहे या विषयी सांगितले. परिसंवादात साठी मुख्य वक्ते म्हणून महाविद्यालयातील प्रा. डॉ. एस. ए. पाटील यांनी आपल्या व्याखानात सर्वप्रथम सादरीकरणाच्या पहिल्या सत्रात बौद्धिक संपदे विषयी सर्वसाधारण माहितीचे विवेचन केले. तसेच बौद्धिक संपदाशी निगडीत विविध पैलूवर प्रकाश टाकला. व्याख्यानात त्यांनी विविध दाखले देत बौद्धिक संपदा आणि त्याचे उदाहरणासहीत स्पष्टीकरण केले. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. डी. बी. पाटील यांनी "बौद्धिक संपदा आणि ट्रेड मार्क" विषयी मार्गदर्शन केले. यात त्यांनी ट्रेड मार्क आणि ट्रेड सिक्रेट याविषयी माहिती दिली. यानंतर त्यांनी पेटंट व ट्रेडमार्क विषयी माहिती देऊन प्रत्यक्ष पेटंट नोंदणीची सविस्तर माहिती दिली. तसेच या संदर्भात असलेले विविध कायदेविषयक तरतुदी व संशोधकाला मिळणाऱ्या विविध संधी याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या मनात असलेल्या शंकाचे निरसन केले. कार्यक्रमात शेवटच्या सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी समारोप प्रसंगी भाषणात "बौद्धिक संपदा हक्क" या विषयाचे परिसंवाद आयोजना बद्दल चे महत्व सांगितले तसेच बौध्दिक संपदा हक्क याविषयी विद्यार्थी, संशोधक, व्यवस्थापक यांच्यामध्ये जाणिव व जागृती होण्याची गरज आहे असे सांगतले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गर्शिनाखाली कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सतीश एन. वैष्णव तसेच सदस्य डॉ. एस. ए. पाटील प्रा. एच. एम. बाविस्कर, डॉ. जे. पी. नेहेते, प्रा. एस. बी. पाटील तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रदीप तायडे यांनी तर आभार डॉ. जे. पी. नेहेते यांनी मानले.

## आंतरवासिता निरोप समारंभ...

पद्धतीने चालते तसेच शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे कर्तव्य, जबाबदाऱ्या कशा पार पाडल्या जातात या सर्वांचे प्रशिक्षण या कालावधीत घेतले जाते. तसेच प्रत्यक्ष वर्गात जाऊन अध्यापनाचे कार्य कसे केले जाते त्यामुळे शिक्षक होण्यास पात्र होण्यासाठी गुण कौशल्य विकसित होण्यास मदत होते. सर्व विद्यार्थ्यांना गटानुसार मार्गदर्शन करण्यात आले. आंतरवासिता उपक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिता वानखेडे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रतिभा पाटील, डॉ. अनिता जावे, डॉ. जयश्री पाटील, प्रा. सुवर्णा अहिरे, प्रा. निधी शर्मा, प्रा. बसरा पावरा, प्रा. जयश्री शिंगाडे या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

## खडसे महाविद्यालयात राष्ट्रीय...

दुसरे प्रमुख पाहुणे, मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांनी रयतेचा राजा म्हणून शिवरायांनी जे स्थान भारतीयांच्या मनात निर्माण केले, ते सुमारे ३५० वर्षांनी सुद्धा टिकून आहे. त्यातूनच सुराज्याची संकल्पना सिद्ध होते, असे विचार मांडले. उद्घाटन सत्राच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एच. ए. महाजन होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. पंकजकुमार प्रेमसागर यांनी केले. उद्घाटन सत्राचे आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ.ए.पी.पाटील यांनी केले. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी पाठविलेल्या संदेशाचे वाचन डॉ. पाटील यांनी केले. सदर चर्चासत्रात भारतातील विविध राज्यातून १०० पेक्षा जास्त शोधनिबंध सादर करण्यासाठी आलेत. त्याचे सादरीकरण दोन सत्रांमध्ये करण्यात आले. सत्राध्यक्ष म्हणून प्रा. मुक्ता महाजन, संचालक, भाषा प्रशाला, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठ, जळगाव, प्रा. विजय तूंटे, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ प्रमुख, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठ, जळगाव यांनी जबाबदारी पार पाडली. समारोप सत्रात प्रा. पी. डी. जगताप, माजी संचालक, सामाजिक शास्त्रे विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी प्रमुख वक्ते म्हणून केलेल्या मार्गदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कृषी, सांस्कृतिक, लष्करी क्षेत्रात क्रांती घडवून आणली. कारण त्यांनी सर्व जाती -धर्माच्या नागरिकांना भेदाभेद न करता आपली लेकरे मानली, त्यांच्या कल्याणासाठी अतोनात प्रयत्न केलेत. त्यामुळेच आजही त्यांच्या विचार व कार्याचा सबंध जगातून अभ्यास केला जात आहे, असे सांगितले. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रशांत देशमुख, इतिहास अभ्यासमंडळ प्रमुख, क.ब.चौ.उ.म. वि. जळजाव यांनी सुशासन प्रणालीची वैशिष्टे प्रतिपादन करीत छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या प्रशासनात ही सर्व वैशिष्टे दिसून येतात. त्याची आजच्या काळात गरज असल्याचे सांगितले. या सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. अतुल बढे यांनी केले. सदर चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे संचालक मंडळ, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## आखिल भारतीय आंतर...

पटेल कला व विज्ञान महाविद्यालय शिरपूर,१५) सोनवणे प्रतीक पटेल आय एम आर महाविद्यालय शिरपूर,१६) जगताप सम्मक आर सी पटेल महाविद्यालय शिरपूर,संघ प्रशिक्षक डॉक्टर सचिन झोपे - संघ व्यवस्थापक श्री पंकज महाजन

पान १ वरून

## पारोळ्यात संयुक्त विद्यमाने...

उपस्थित होते. यावेळी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. शेवटी सुवर्णा पाटील यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी सद्गुरु


**जाहिर नोटिस**

ॲड.श्री.डी.आर.सूर्यवंशी

जामनेर येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश क, स्तर, जामनेर यांचे कोर्टात जि. जळगांव

दि.कि.अ.न. ५२/२०२४
निशाणी- ७

१.आशाबाई ज्ञानेश्वर पाटील,
उ.व-७७, धंदा शेती, ...अर्जदार
रा. मेणगांव ता. जामनेर जि. जळगांव
२.ज्योती राहुल पाटील उ.व ३४, धंदा शेती
रा. कुंभारखेडे, ता. रावेर जि. जळगांव
३. रुपाली स्वप्नील पाटील, उ.व ३०, धंदा-शेती
रा. पुनगांव-अंतुर्ली ता. पाचोरा जि. जळगांव
विरुध्द
कोणाही नाही ...सामनेवाले

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट फलग २ व ३ प्रमाणे फायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी

१) अर्जदार हे मौजे मेणगांव ता. जामनेर जि. जळगांव येथील कायमचे रहिवाशी आहे तसेच अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा स्वर्गीय ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांचे वारस आहेत. असा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२) अर्जदार क. १ ते ३ हे मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांचे वारस असुन, त्यांचा मृत्यू मौजे मेणगांव ता. जामनेर जि. जळगांव येथे झालेला आहे. मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांची अर्जदार क. १ ही पत्नी असुन अर्जदार फ. २ व ३ या दोघी मुली आहेत. तसेच मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांची आई नामे वाणुबाई गोविंदा पाटील या दि. १५/०४/१९९९ रोजी मयत झालेल्या आहेत. येणेप्रमाणे अर्जदारांशिवाय मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांचे दुसरे इतर वारस नाहीत.

३) मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील हे दि. २८/०२/२०१६ रोजी मोजे. मेणगांव ता. जामनेर जि. जळगांव जि. जळगांव येथे मयत झालेले असुन, त्यांचा अंतिम संस्कार मौजे मेणगांव ता. जामनेर जि. जळगांव येथ झालेला आहे.

४) मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांचे वारस असल्याचा वारस दाखला ( Legal Heirship Certificate ) अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामी पाहिजे आहेत. मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांचे वारस यांचे कायदेशिर वारस ठरुन मिळणेसाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्जदार यांनी मे. कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे.

५) त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हेच मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त मयत ज्ञानेश्वर गोविंदा पाटील यांना आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वतः किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात दि. २५/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष जाय देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वतः हजर रहावे.

जर अर्जदार यांचे व्यतीरिक्त कोणीही वारस नाही, असे समजून आल्यास मे. कोर्ट पुढील आदेश करतील या कामी आपण हजर न राहील्यास आपले काहीएक म्हणणे नाही असे समजण्यात येवुन आपला बचाव रद्द होणेस प्राप्त होईल.

आज दिनांक २२ मार्च २०२४ रोजी माझया सहीने व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.

क.लिपिक हुकूमावरुन
सहा.अधिक्षक


महिला उद्योग समाजाच्या पदाधिकारी यांनी सहकार्य केले. बीज सोहळ्यानिमित्त निमित्त पाणपोईचे उद्घाटन येथील अनुष्का डेअरी चे संचालक देविदास चैत्राम पाटील यांच्या संकल्पनेतून मनोज देविदास पाटील यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त पालिका चौकात पाणपोई सुरू केली. दरम्यान हे पाणपोई अखंडित तिसरे वर्ष असून एक्का चे पाणी नागरिकांना दिवसभर पुरविले जाते.

## महानगरपालिकेत कार्यरत...

प्रशिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी दिपाली पाटील, सहाय्यक आयुक्त अश्विनी गायकवाड, अभियंता प्रकाश पाटील, योगेश बोरोले एनएलएम समूह संघटक गायत्री पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## आंबेडकरांची...

झालेत. काल रात्री मी मनोज जरांगे पाटील यांना भेटलो. विस्ताराने बोलणे झाले. त्यात ओबीसीसोबत आघाडीचा निर्णय घेतला गेला.

## टाकरखेडा येथे विठ्ठल...

परमेश्वर महाराज (गोंडखेड) यांचे काल्याचे किर्तन संपन्न झाले. जि. प. सदस्य जे. के. चव्हाण, , शिक्षण संस्थेचे सचिव जितेंद्र रमेश पाटील, यांचे सह मा. शिक्षण सभापती मधुकर शिंदे, पत्रकार प्रकाश सैतवाल, भाजपा तालुका उपाध्यक्ष भाईदास चव्हाण चव्हाण, धर्मराज शिंदे, सुधाकर भोई, विश्वनाथ भोई, पंढरी केणे, राजेंद्र उघडे, शिवाजी पुंडलिक पाटील, सांडू ठाकूर, ईश्वर ठाकूर, भाऊराव उघडे, शिवदास शिंदे, विकास उघडे, सापुर्डा गोसावी, विश्वनाथ डोंगरे यांचे सह सर्व ग्रामस्थ, भजनी मंडळ, महिला मंडळ उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

भडगांव येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात

**क्र.दंडप्र/जन्माची नोंद आदेश/कावि-३७/२०२४**
**अर्जदार:-** श्री/श्रीमती विनोद शांताराम चौधरी, रा. बाळद रोड, स्वामी समर्थ कॉलनी भडगांव ता. भडगांव
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी, भडगांव **... सामनेवाला**
ता. भडगांव जि. जळगाव
**अर्ज:- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३[३]प्रमाणे मृत्यूची नोंद होणेबाबत....**

याव्दारे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोदंणी अधिनियम १९६९ चे कलम १३[३] प्रमाणे मृत्यूची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी **स्वत: श्री विनोद शांताराम चौधरी यांचा जन्म दाखला** मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.अर्जदार यांनी **स्वत: श्री विनोद शांताराम चौधरी, जन्म दिनांक ०१/०६/१९८३ रोजी मौजे भडगांव** ता. भडगांव जि. जळगांव येथे झालेला आहे.मुख्याधिकारी भडगांव ता. भडगांव जि. जळगांव यांचेकडेस अर्जदार यांनी **स्वत: श्री विनोद शांताराम चौधरी,** जन्माची नोंद झालेबाबत चौकशी/ तपास केला असता सदर नोंद आढळुन येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, भडगांव यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुध्द कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन तीस दिवसाच्या आत किंवा **दिनांक २६/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजे** पावेतो मे. तहसिलदार भडगांव ता. भडगांव जि. जळगाव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेवुन जन्माची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल.**आज दि. २६/०२/ २०२४ रोजी** माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.

**सही/**
**विजय बनसोडे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी भडगाव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **ॲड.बी.बी.पिंजारी**

**जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**क्र.कावि/दंडप्र ७०/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि. २१/०३/२०२४**
**अर्जदार:-** श्री.शेख मोहम्मद हकीम मोहम्मद हनीफ रा. लोहारा ता. पाचोरा जि. जळगाव
**//विरुध्द//**
सहा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती **... सामनेवाला**
पाचोरा ता. पाचोरा जि. जळगाव

याव्दारे अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असुन त्या अर्जात **अर्जदार यांचा जन्म दि. १९/०५/२००२ रोजी मौजे लोहारा ता. पाचोरा** जि. जळगांव येथे झाला आहे. मात्र अर्जदाराने त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद मृत्यु नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत लोहारा ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे केलेली नाही. अर्जदार यांनी ग्रामसेवक ग्रामपंचायत लोहारा ता. पाचोरा यांच्याकडे अर्जदाराच्या जन्माची नोंद जन्म नोंद रजिष्टर मध्ये झालेली नाही. याबाबत सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला प्रकरण सादर केला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदाराच्या जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय / निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे. सदरहु अर्जदार यांच्या जन्माच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत, तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या जन्माच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या जन्माच्या नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल.आज **दिनांक २१/०३/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगाव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **ॲड.बी.बी.पिंजारी**

**जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**क्र.कावि/दंडप्र ७२/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि. २१/०३/२०२४**
**अर्जदार:-** श्रीम. सायमाखान आकमखान पठाण, लग्नापुर्वीचे नाव सायमाबी शेख वाहेद, रा. लोहारा ता. पाचोरा जि. जळगाव
**//विरुध्द//**
सहा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती **... सामनेवाला**
पाचोरा ता. पाचोरा जि. जळगाव

याव्दारे अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असुन त्या अर्जात **अर्जदार श्रीम.सायमाबी शेख वाहेद यांचा जन्म दि. ०२/०२/२००० रोजी मौजे लोहारा ता. पाचोरा** जि. जळगांव येथे झाला आहे. मात्र अर्जदाराने त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद मृत्यु नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत लोहारा ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे केलेली नाही. अर्जदार यांनी ग्रामसेवक ग्रामपंचायत लोहारा ता. पाचोरा यांच्याकडे अर्जदाराच्या जन्माची नोंद जन्म नोंद रजिष्टर मध्ये झालेली नाही. याबाबत सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला प्रकरण सादर केला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदाराच्या जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय / निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे. सदरहु अर्जदार यांच्या जन्माच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत, तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या जन्माच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या जन्माच्या नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल.आज **दिनांक २१/०३/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगाव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **ॲड.बी.बी.पिंजारी**

**जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**क्र.कावि/दंडप्र ७१/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि. २१/०३/२०२४**
**अर्जदार:-** श्री. मोहम्मद हमजा मोहम्मद हनीफ शेख, रा. लोहारा ता. पाचोरा जि. जळगाव
**//विरुध्द//**
सहा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती **... सामनेवाला**
पाचोरा ता. पाचोरा जि. जळगाव

याव्दारे अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असुन त्या अर्जात **अर्जदार यांचा जन्म दि. १७/०७/१९९९ रोजी मौजे लोहारा ता. पाचोरा जि. जळगांव येथे झाला आहे.** मात्र अर्जदाराने त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद मृत्यु नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत लोहारा ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे केलेली नाही. अर्जदार यांनी ग्रामसेवक ग्रामपंचायत लोहारा ता. पाचोरा यांच्याकडे अर्जदाराच्या जन्माची नोंद जन्म नोंद रजिष्टर मध्ये झालेली नाही. याबाबत सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला प्रकरण सादर केला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदाराच्या जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय / निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे. सदरहु अर्जदार यांच्या जन्माच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत, तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या जन्माच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या जन्माच्या नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल.आज **दिनांक २१/०३/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगाव**



**ॲड.एस.आर.पाटील**

**जाहिर नोटिस**

**जामनेर येथील मे. तहसिलदार यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद अर्ज नं. २४/२०२४**
**अर्जदार :-** श्री अनिल संभाजी जोशी, उ. व. ३७,धंदा मजुरी,रा.शेंगोळा ता. जामनेर जि. जळगाव
**//विरुध्द//**
म.ग्रामसेवक तथा निबंधक सो. **....सा.वाला**
जन्म मृत्यु नोंदणी विभाग, ग्रामपंचायत
कार्यालय, शेंगोळा ता. जामनेर जि. जळगाव
**अर्ज:- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ नुसार**

सदर अर्जदार मे. कोर्टात विनुतीपुर्वक कळवितो ते येणेप्रमाणे की,१]अर्जदार हे मौजे शेंगोळा ता. जामनेर येथिल कायमचे रहिवासी आहे. अर्जदार यांचा **जन्म ता. ०१/०६/१९८६ रोजी मौजे शेंगोळा ता. जामनेर** येथे अर्जदाराचे मुळ गावी झालेला आहे. परंतू अर्जदाराचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला करण्याचे राहून गेलेले आहे.[२]असे असतांना, अर्जदाराजवळ त्यांचे जन्माचे नोंद हवी असल्याने अर्जदार यांनी त्यांचे जन्माची नोंद म. ग्रामसेवक तथा निबंधक सो. ग्रामपंचायत कार्यालय शेंगोळा ता. जामनेर यांचेकडे मागणी केली असता त्यांनी **सन १९८६ चे जन्म नोंद दप्तरमध्ये अर्जदाराचे जन्माची** नोंदचा शोध घेतला असता अर्जदार यांचे जन्माची नोंद अढळ होत नाही, **असा दाखला दि.०७/०२/२०१४ रोजी दिला आहे.** त्यामुळे जन्माची नोंद होवून तसा जन्म दाखला मिळणेसाठी जामनेर तहसिल ऑफीस मधून जन्माची नोंद करणेबाबतचा आदेश आल्याशिवाय आम्हांला नोंद करता येणार नाही असे सांगितले म्हणून अर्जदारास त्यांचे जन्माची नोंद करणेबाबतचा आदेश होणेसाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे.[३]त्याअर्थी उपरोक्त किरकोळ अर्जाचे कामी अर्जदाराचे जन्म मौजे शेंगोळा ता. जामनेर जि. जळगाव येथे झालेला आहे. याबाबत कोणाचीही हरकत असल्यास किंवा काही म्हणणे असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात **दि. २८/०५/२०२४ रोजी** प्रत्यक्ष जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. जर कोणताही पुरावा मे. कोर्टासमोर न आल्यास अर्जदाराचे मुलीचे जन्मा नोंद करणेबाबत योग्य ते आदेश करतील आज दिनांक **२४/३/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जामनेर**
**ता. जामनेर जि. जळगाव**



प्रोसेस जमा **ॲड.बी.आर.पाटील**

**जाहीर नोटीस**

**भडगांव येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो.यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.३५/२०२४ निशाणी ०७**
**चौकशी तारीख १०/०४/२०२४**
**अर्जदार:-** [१]सुशिला रमेश परदेशी, उ. व. ६६,धंदा घरकाम [२]प्रमोद रमेश परदेशी, उ. व. ४३ धंदा मजुरी [३]रंजना संजय परदेशी, उ. व. ४०,धंदा घरकाम [४]रुमणबाई रामकिसन पाशी,उ.व.६३,धंदा घरकाम [५]सुनंदा शाम परदेशी, उ.व.४६,धंदा घरकाम, सर्व रा.ह.मु.पिंपरखेड ता. भडगांव जि.जळगाव
**//विरुध्द//**
कोणीही नाही **... सामनेवाला**
**अर्ज -बॉम्बे रेग्युलेशन कलम २व३ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज**


ज्याअर्थी अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ व ३ ची आई आहे. अर्जदार नं. ४ ही अर्जदार नं. १ ची दिराणी आहे व अर्जदार नं. ५ ही अर्जदार नं. १ ची नणंद आहे. अर्जदार नं. १ चे पती अर्जदार नं. २ व ३ चे वडील अर्जदार नं. ४ चे जेठ आणि अर्जदार नं. ५ चे भाउ **नामे रमेश बन्सीलाल परदेशी हे दिनांक ३०/०५/२०२३ रोजी** मौजे पिंपरखेड ता. भडगांव जि. जळगाव येथे मयत झालेले आहेत. तसेच **रमेश बन्सीलाल परदेशी यांची आई नामे सरुबाई बन्सीलाल परदेशी ही दिनांक ०१/०७/२०१९ रोजी कचंनपुरा,** उज्जैन मध्यप्रदेश येथे मयत झाली असुन **वडील नामे बन्सीलाल रामा परदेशी हे दिनांक १७/०८/१९८९ रोजी मौजे पिंपरखेड** ता. भडगांव जि. जळगांव येथे मयत झालेले आहेत. सदर मयतांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नव्हते व नाही.**मयत बन्सीलाल रामा परदेशी** यांना वंशावळप्रमाणे २ मुले व १ मुलगी होती त्यापैकी **दोन्ही मुले नामे रमेश व रामकिसन हे मयत झालेले आहेत. रामकिसन हे दिनांक ३०/१०/२०१५ रोजी निंबोला येथे मयत** झालेले आहेत. त्यापैकी अर्जदार नं. ४ ही त्यांची पत्नी वारस असुन त्यांना मुलबाळ नाही व **अर्जदार नं. ५ ही बन्सीलाल रामा परदेशी यांची मुलगी** असल्याने तिचे नाव वारस सदरील घेतले आहे.**मयत बन्सीलाल रामा परदेशी** यांचे नावे **मालकी हक्कात मौजे पिंपरखेड ता. भडगाव येथे सि.स.नं.३७२ व सि.स.नं.४२६ या दोन्ही मिळकती आजही नावे आहेत** व सदर मिळकतींना मौजे पिंपरखेड ता. भडगाव येथे **ग्रा.प.मालमत्ता क्रमांक ४९३ व १३५ असा** लागलेला असुन सदरील दोन्ही मिळकती एकच असुन सदरील मिळकीतच मालकी हक्कात **बन्सीलाल रामा परदेशी** यांची पत्नी **नामे सरुबाई बन्सीलाल परदेशी यांचे नावे आहे.** सदर दोन्ही मयत झालेले असुन त्यांना अर्जदाराशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. सदर मिळकतींना नाव लावणेसाठी **अर्जदार हे दि. २९/०२/२०२४ रोजी सिटी सर्व्हे ऑफीस व ग्रामपंचायत पिपंरखेड** येथील कार्यालयात जावुन वारसांची नावे लावणेबाबत विनंती केली असता संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी वारसांची नावे लावणेस नकार दिला व मे. कोर्टातून वारस दाखला घ्यावयास तोंडी सांगितले.तरी वरील अर्जदार यांनी मे. भडगांव न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. तरी त्याबाबत कोणाचीही काहीएक हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या /सायटेशन तारखेपासुन एक महिन्याचे आत भडगाव कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन मे. कोर्ट योग्य तो आदेश पारीत करील.**आज दि. ०६/०३/ २०२४ रोजी** माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-** **हुकूमावरुन**
**क.लिपीक** **सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर भडगाव**

लोकशाही

संपादकीय

# लोकसभेसाठी सुरेश दादांची भूमिका महत्त्वाची ठरणार..!



लोकसभा निवडणूक प्रचाराला सुरुवात झाली आहे. जळगाव जिल्ह्यातील जळगाव आणि रावेर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शेवटच्या टप्प्यात १३ मे ला होणार आहे. १९ एप्रिल पासून निवडणूक अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. दरम्यान जळगाव व रावेर मतदार संघातील भाजप मधल्या दोन्ही उमेदवारांची घोषणा झालेली आहे. मविआचे उमेदवार अद्याप घोषित होणे बाकी आहे. त्यामुळे महायुती म्हणजे भाजपच्या उमेदवारीच्या भेटीगाठी घेऊन प्रचार सुरू आहे. जळगाव लोकसभा मतदारसंघात जळगाव शहराचा समावेश आहे. त्यामुळे जळगाव शहर हे मतदानाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. २०१४ पर्यंत जळगाव लोकसभा मतदारसंघातून सात वेळा निवडणूक लढवून निवडून येणाऱ्या माजी मंत्री सुरेश दादा जैन यांचे जळगाव शहराशी घट्ट नाते जुळले आहे. जळगाव शहर आणि सुरेश दादा जैन हे एक समीकरणच निर्माण झाले होते. २०१४ साली विधानसभेची निवडणूक सुरेश दादांनी तुरुंगातून लढवली आहे. त्यात ते पराभूत झाले. त्यांच्या पराभवानंतर तब्बल दहा वर्षात जळगाव शहराच्या विकासाच्या संदर्भात शहरवासीयांच्या अपेक्षांवर पाणी फेरले आणि जळगाव शहराच्या विकासाची वाट लागली. जळगाव शहराच्या विकासासाठी जळगावकरांना सुरेश दादा जैन हवेत. सुरेश दादांच्या स्वप्नातील जळगाव शहर निर्माण होणे राजकारण्यांना परवडणारे नव्हते. म्हणून राजकीय षडयंत्र रचण्यात आले. त्या राजकीय षड्यंत्रातून जळगाव आणि शहराचे भले तर झाले नाहीच; उलट जळगाव शहराचा सत्यनाश झाला असेच म्हणावे लागेल. असो.. घाणेरडे राजकारणाला कंटाळून आता राजकारणापासून दूर झालेले सुरेश दादा २०२४ च्या निवडणुकीत कोणती भूमिका घेणार? याकडे भाजप सह विरोधी पक्षांचे लक्ष लागून आहे. कालच जळगाव शहराच्या लोकसभेच्या भाजपच्या उमेदवार स्मिता वाघ यांनी सुरेश दादा जैन यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. त्यांच्या समावेत त्यांच्या कन्या तथा भाजपच्या प्रदेश महिला युवा मोर्चाच्या उपाध्यक्ष भैरवी पलांडे या देखील उपस्थित होत्या. स्मिता वाघ यांनी सुरेश दादांची भेट लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतली, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. जवळपास तासभर झालेल्या या भेटीत विविध विषयांवर चर्चा झाली. त्यात जळगाव शहराच्या विकासाच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. जळगाव शहराच्या विकासासंदर्भात सुरेश दादा जैन यांची एक स्वतंत्र कल्पना आहे. त्यामुळे सुरेश दादांच्या अनुभवाच्या अनेकांना फायदा होऊ शकतो. स्मिता वाघ यांनी सुद्धा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एकनिष्ठ कट्टर कार्यकर्त्याची भूमिका त्यांनी पार पाडली आहे. जिल्हा परिषदेच्या पहिला महिला अध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी कामगिरी पार पाडले आहे. त्यानंतर विधानसभा परिषदेवर आमदार म्हणून झालेली त्यांची निवड म्हणजे त्यांच्या कार्याची जणू पावतीच म्हणता येईल. २०१९ च्या विधानसभेसाठी पक्षाची उमेदवारी मिळाल्यानंतर २०२४ साली त्यांना पक्षाने उमेदवारी दिल्याने त्यांना फार मोठी सहानुभूती मिळालेली आहे. निवडणूक प्रचाराचा एक भाग म्हणून स्मिता वाघ यांनी सुरेश दादा जैन यांची घेतलेल्या भेटीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहेत.

जळगाव शहरात अनभिषिक्तपणे राज्य करणारे अथवा 'जळगाव शहर म्हणजे सुरेश दादा जैन यांच्या गळ्यातले ताईत' अशी ओळख असलेल्या सुरेश दादा जैन यांनी सध्या वयोमानानुसार तसेच प्रकृती अस्वास्थ्यामुळे सक्रिय राजकारणापासून स्वतःला दूर सारले आहे. आपल्या राजकीय कारकीर्दीत जळगावच्या विकासाच्या आड येणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षांशी त्यांनी कधी तडजोड केली नाही. राजकारणाला काँग्रेस पक्षापासून सुरुवात झाली असली तरी त्यांनी काँग्रेस, एस काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना असे पक्ष बदल केले. जळगाव शहराच्या विकासाच्या आड येणाऱ्या कोणत्याही पक्षाशी त्यांनी तडजोड केली नाही. त्यांनी कोणत्याही पक्षाबरोबर तडजोड केली असती, तर राजकारणात त्यांना अनेक मोठी पदे मिळवता आली असती. परंतु त्यांनी पदा ऐवजी शहराचा विकास महत्त्वाचा मानला. त्यातून झोपडपट्टी मुक्त जळगाव शहर, गरिबांना पक्की घरे देणे, नगरपालिकेची देशातील पहिली १७ मजली प्रशासकीय इमारत, जळगाव शहराला आगामी ५० वर्षे पिण्याचे पाणी मिळेल अशी वाघुर पाणीपुरवठा योजनेची निर्मिती, जळगावला आंतरराष्ट्रीय विमानतळाची निर्मिती आणि जळगाव शहर स्वच्छ, सुंदर, हिरव्यागार करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या या नेत्याच्या स्वप्नाचा गलिच्छ राजकारण्यांनी चुरडा केला. तथापि आज त्यांची जळगावकरांना आठवण येते आहे. जळगाव शहरातील गुन्हेगारी गुंडगिरी मोडून काढण्यात सुरेश दादांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे सुरेश दादांनी लोकसभा निवडणुकीत कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. विरोधी पक्षाचे उमेदवार सुद्धा सुरेश दादांची भेट घेतील. प्रत्यक्षात ते कोणत्या पक्षाकडे आपला कल देतील हे महत्त्वाचे ठरणार आहे...!

# आंबेडकरी कार्यकर्त्याला सत्तेत येऊ दिले जात नाही

## राष्ट्रीय अध्यक्ष विजय घाटे यांचे वर्धापन दिन आणि कार्यकर्ता मेळावा दरम्यान परखड वक्तव्य

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ठाणे** प्रतिनिधी

आज महाराष्ट्रात फुटीर पक्षांची राजकीय खिचडी बनली आहे. आम्हाला या खिचडीत सहभागी होण्यात स्वारस्य नसून आम्हाला रिपब्लिकन चळवळीला न्याय द्यायचा आहे. या फुटीर राजकीय वातावरणात बिथरलेल्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना पुनश्च सोबत जोडण्यासाठी त्यांचे मत आणि मन तयार करण्याचे आवाहन या रिपब्लिकन बहुजन सेनेसमोर असल्याचा भावनिक प्रतिसाद सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय घाटे यांनी तलाव पाळी येथील छत्रपती शिवाजी मैदानावर आयोजित १०वा वर्धापन दिन आणि कार्यकर्ता मेळावा प्रसंगी बोलताना केले. यावेळी आपण ठाणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असून राज्यातील ४८ जागेवर उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितले. आपणा सर्वांना कंबर कसून काम करायचे आहे. ज्यांनी आंबेडकरी चळवळीचे शेले बांधून मिरवले. त्याचा आम्हाला आनंद आहे. परंतू आमच्या एकाही आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्याला सत्तेच्या दिशेने येऊ दिले जात नाही. त्याला कुठेतरी आम्हीच जबाबदार आहोत. कारण वर्षभर इमानदारीने काम करणारा



कार्यकर्ता ऐन निवडणुकीच्या वेळी कोणत्या तरी पक्षाच्या दावणीला बांधले जातो. . मात्र या वेळी जनसामान्यांचा आवाज असणारी रिपब्लिकन बहुजन सेना कार्यकर्त्यांची विक्री होऊ देणार नाही. त्यांना न्याय देण्यासाठी आपण ठाणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय घाटे यांनी जाहिरपणे छत्रपती शिवाजी मैदान येथे आयोजित १० वा वर्धापन दिन आणि कार्यकर्ता मेळावा दरम्यान केले. वर्धापन दिनानिमित्त दै जनादेश संपादक कैलाश म्हापदी, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ, गंगाराम इंदिसे, , भीम बुद्ध गीतांचे गायक, गीतकार प्रभाकर पोखरीकर आशा शरणागत, आदींचा भीम गौरव २०२४ पुरस्काराने गौरविण्यात आले.

आगामी होऊ घातलेली लोकसभा आणि रिपब्लिकन बहुजन सेना वर्धापन दिन व कार्यकर्ता मेळावा याचे आयोजन तलावपाळी येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मंगळवारी करण्यात आले होते. या वेळी बहुजन सेनेचे मुश्ताक मलिक, प्रदेश उपाध्यक्ष अजीज पठाण, महाराष्ट्र महिला अध्यक्षा शोभा आर्या, प्रवक्ते व्यंकटेश कांबळे, आदी उपस्थित होते. या निमित्ताने ज्यांचे बहुजन समाज आणि आंबेडकरी चळववळीसाठी योगदान आहे. अशांना भीम गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याचे अध्यक्ष विजय घाटे यांनी सांगितले. यावेळी अंध गायकांनी दमदार आवाजात म्हटलेल्या ढलता सूरज धीरे धीरे कव्वालीने उपस्थितांची मने जिंकली.

# भाजपच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आज शेंदुर्णीत आयोजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी ता. जामनेर** प्रतिनिधी

रावेर लोकसभा मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार श्रीमती रक्षा निखिल खडसे यांच्या प्रचारार्थ दि. २८-०३-२०२४ आज रोजी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदर मेळाव्यास निवडणूक प्रभारी चैनसुख संचेती, लोकसभा निवडणुक प्रमुख नंदकिशोर महाजन, जिल्हाध्यक्ष अमोल जावळे उपस्थित राहणार असून सर्व जि. प. सदस्य, पं. स. सदस्य, गट प्रमुख, गण प्रमुख, सुपर वारीयर्स, बुथ प्रमुख यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी पारस मंगल कार्यालय, शेंदुर्णी शहर. सकाळी ९:०० वा. आवर्जून उपस्थित राहावे, असे आव्हान डॉ. पंकज सुर्यवंशी भाजपा शहराध्यक्ष शेंदुर्णी यांनी केले आहे.

# खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत जय महाराष्ट्र संघ विजयी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शिंदाड** प्रतिनिधी

येथे आयोजित खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात जय महाराष्ट्र क्रिकेट क्लब शिंदाड यांनी पाचोरा स्पोर्ट्स पराभव करून विजेते पद पटकावले. शिंदाड येथे दि. १० मार्च पासून सुरू असलेल्या खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत परिसरातील ३० संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना पाचोरा स्पोर्ट व जय महाराष्ट्र क्रिकेट क्लब शिंदाड यांच्यात झाला. नाणेफेक जिंकून शिंदाड संघाने प्रथम फलंदाजी



करण्याचा निर्णय घेतला. निर्धारित आठ षटकात त्यांनी ७७ धावा केल्या. मात्र पाचोरा स्पोर्ट यांना फक्त ६७ धावांवर समाधान मानावे लागले. व शिंदाड जय महाराष्ट्र संघाने हा सामना १० धावांनी जिंकला. शिंदाड संघाकडून दीपक जाधव यांनी अष्टपैलू कामगिरी केली. तर विनोद तडवी, शाबिर शेख, किरण भोई यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. भूषण पाटील पाचोरा यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. प्रथम बक्षीस आमदार किशोर पाटील यांचे कडून रू. २१०००/तर द्वितीय बक्षीस माजी जि प सदस्य मधुकर पाटील रू. १५०००/, तर तृतीय बक्षीस सोसायटी चेअरमन समाधान पाटील व विजय पाटील यांनी ₹ ११०००/ सयुक्तिक दिले. बक्षीस वितरण चेअरमन समाधान पाटील, ग्रा. प. सदस्य संदीप सराफ, विलास पाटील, विजय पाटील, प्रा. अरुण पाटील, अशोक पाटील, गोपाल पाटील प्रदीप बोरसे यांचे हस्ते देण्यात आले. अंतिम सामन्यात पंच म्हणून संदीप सराफ, नरेश देवरे तर गुण फलक कल्पेश पाटील, समालोचक म्हणून बालू श्रावने, गणेश न्हावी, व स्वानंद सराफ यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी साठी योगेश पाटील, विनोद तडवी, दीपक जाधव, बापू पाटील, किरण भोई, यांनी सहकार्य केले.

# सत्र न्यायालयाकडून आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी

सहाय्यक पोलीस अधीक्षक सो. चाळीसगाव उपविभाग श्री अभयसिंह देशमुख यांना भडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील गिरणा नदी पात्रातून वाळूची अवैध चोरटी वाहतूक होत असल्याची गुप्त बातमी मिळाल्यामुळे त्यांनी पो. कॉ. राहुल राजेंद्र महाजन चाळीसगाव व इतर यांना बोलावून कारवाई करण्यास जाण्याबाबत सांगितले. त्यामुळे सहायक पोलीस अधीक्षक व इतर कर्मचारी यांनी दि. २५/०२/२०२४ रोजी रात्री ००-१५ वाजता त्याठिकाणी छापा



टाकला. त्यावेळी ०७ आरोपीतांना अटक केली तसेच पो.कॉ. राहुल राजेंद्र महाजन यांचे फिर्यादीवरून भडगाव पोलीस स्टेशनला आरोपितांचे विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम- ३७९ व ३४, जमीन महसूल संहिता कलम ४८(७)(८), मोटार वाहन अधिनियम कायदा कलम ३, ५ व १८१ प्रमाणे गु.र.नं.-५०/२०२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचेकामी पाच डंपर, दोन जेसीबी, पाच ट्रॅक्टर ट्रॉलीसह अशी वाहने व रेती असा एकूण र.रु. १,५४,०६,०००/- मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून गुन्ह्याचेकामी पप्पू उर्फ प्रवीण रघुनाथ पाटील, बापू जगन्नाथ गंजे, गणेश संतोष मराठे, आबा नामदेव मराठे व रवी पवार यांची नावे सदर गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे पप्पू उर्फ प्रवीण रघुनाथ पाटील, बापू जगन्नाथ गंजे, गणेश संतोष मराठे, आबा नामदेव मराठे यांचे तर्फे ॲड. निलेश जवाहरलाल तिवारी, भडगाव यांचे मार्फत जळगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज नं. २६४/२०२४, १०९/२०२४ व ११०/२०२४ असे अर्ज दाखल करण्यात आलेले होते. त्याकामी सह जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहिते साहेब यांनी नुकताच आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर करण्याबाबत आदेश पारित केलेला असून आरोपीस र.रु. ५०,०००/- च्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामिनावर सोडण्याचा आदेश केला आहे. आरोपितांचे तर्फे ॲड. निलेश जवाहरलाल तिवारी, भडगाव यांनी अर्ज दाखल करून युक्तिवाद केला व कामकाज पहिले.



# कृष्णापुरीत संत तुकाराम बीज उत्साहात साजरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

शहरातील कृष्णापुरी येथे २७ मार्च रोजी सालाबादप्रमाणे श्री. संत तुकाराम महाराज बीज निमित्ताने श्री संत तुकाराम महाराज यांचे प्रतिमेचे पूजन, आरती व प्रसाद स्वरुपी भोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मधुकर काटे यांच्या हस्ते विधीवत आरती पुजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन निंभोरीकर मल्टी सर्व्हिसेसचे संचालक किशोर निंभोरीकर यांनी केले होते. या कार्यक्रमाचा परिसरातील असंख्य भाविकांनी लाभ घेतला.

# राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा हेच आपले अंतिम ध्येय




**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात दिनांक २३ मार्च २०२४ रोजी शहीद दिनानिमित्त राष्ट्रप्रेमाची व राष्ट्रनिष्ठेची प्रतिज्ञा घेतली. महाविद्यालयातील इतिहास विभागातील प्रा. डॉ. डी. आर. कोळी यांनी शहीद दिनाप्रसंगी आजच्या युवकांचे अंतिम ध्येय राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रनिष्ठा असली पाहिजे, तसेच कुटुंबापेक्षा समाज श्रेष्ठ आणि समाजापेक्षा राष्ट्रश्रेष्ठ मानले पाहिजे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शहीद राजगुरू, सुखदेव व भगतसिंग यांना स्मरण करून त्यांच्या कार्याचा आदर्श बाळगण्याची प्रतिज्ञा घेतली. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महाजन, उपप्राचार्य डॉ. अनिल पाटील व उपप्राचार्य डॉ. राजेंद्र चौधरी यांनी केले. तसेच महाविद्यालयातील ग्रंथालय अधीक्षक प्रा. सरोदे व एनएसएस महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ताहीरा मीर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. डी. एन. बावस्कर यांनी, प्रास्ताविक कृष्णकांत भारुडकर तर आभार प्रदर्शन प्रा विजय डांगे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वृंद व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.


ॲड.एस.एस.पंडित

**जाहिर नोटीस**

**जामनेर येथील मे. तहसिलदार यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद अर्ज नं. ८९/२०२४**
**अर्जदार :-** शहेबाज खान रशीद खान, उ. व. ५१, धंदा भंगार दुकान,रा. पहुर गल्ली, मौजे जामनेर ता. जामनेर जि. जळगाव
**//विरुध्द//**
म.तहसिलदार साो. ....**सा.वाला**
तहसिल कार्यालय जामनेर
ता. जामनेर जि. जळगाव

**अर्ज:- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ नुसार**
सदर अर्जदार मे. कोर्टात विनुतीपुर्वक कळवितो ते येणेप्रमाणे की,१]अर्जदार हे मौजे **जामनेर ता. जामनेर** येथिल कायमचे रहिवासी आहे. **अर्जदार यांची सासु नामे शाहीन बी शेख मुनीर यांचा जन्म ता. ०१/०६/१९५९ रोजी मौजे पहुरपेठ ता. जामनेर** येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या सासुची जन्माची नोंद हे अनावधानाने करण्याचे राहुन गेलेले होते व आहे. सदर जन्माची नोंद ही शासकिय व निमशासकिय कामासाठी कायद्याच्या दृष्टीने आवश्यक आहे[२]अर्जदार यांना **त्यांच्या सासुचा जन्माचा दाखला** हा शासकिय व निमशासकीय कामासाठी लागत असल्यामुळे अर्जदार हे जन्माची नोंद मिळणेकरीता म. तहसिलदार साो. यांच्याकडे गेले असता, संबंधीत अधिकारी यांनी **सन १९५९ च्या जन्म मृत्यु नोंदणी** अभिलेखात जन्माची नोंद पाहिली असता सदर जन्माची नोंद आढळून आली नाही अशा आशयाचा दाखला **दिनांक ११/०३/२०२४ रोजी** अर्जदारास दिला आहे त्यावेळेस संबंधीत अधिकारी यांनी अर्जदार यास त्यांचा सासुच्या जन्माचा दाखला मिळणेसाठी मे. न्यायालयातून जन्माची नोंद करणेबाबतचा आदेश आल्याशिवाय आम्हांला नोंद करता येणार नाही असे सा. वाले यांनी सांगितले. म्हणून सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे.[३]त्याअर्थी उपरोक्त किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार **यांची सासु नामे शाहीन बी शेख मुनीर यांचा जन्म दि. ०१/०६/१९५९ रोजी मौजे पहुरपेठ** ता. जामनेर जि. जळगाव येथे झालेला आहे. याबाबत कोणाचीही हरकत असल्यास किंवा काही म्हणणे असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात **दि. २८/०५/२०२४ रोजी** प्रत्यक्ष जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. जर कोणताही पुरावा मे. कोर्टासमोर न आल्यास अर्जदाराचे मुलीचे जन्मा नोंद करणेबाबत योग्य ते आदेश करतील आज दिनांक **२६/३/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जामनेर**
**ता. जामनेर जि. जळगाव**



ॲड.पी.के.सोनार

**जाहिर नोटीस**

**जामनेर येथील मे. तहसिलदार यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद अर्ज नं. २८/२०२४**
**अर्जदार :-** श्री अंबादास विठोबा शिंदे, उ. व. ४०,धंदा मजुरी, रा. ओझर खुर्द ता. जामनेर जि. जळगाव
**//विरुध्द//**
म.ग्रामसेवक तथा निबंधक साो. ....**सा.वाला**
जन्म मृत्यु नोंदणी विभाग, ग्रामपंचायत
कार्यालय, ओझर बु.ता. जामनेर जि. जळगाव

**अर्ज:- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ नुसार**
सदर अर्जदार मे. कोर्टात विनुतीपुर्वक कळवितो ते येणेप्रमाणे की,१]अर्जदार हे मौजे ओझर खुर्द ता. जामनेर येथिल कायमचे रहिवासी आहे. **अर्जदार यांची बहीण नामे व्दारकाबाई विठोबा शिंदे हीचा जन्म ता. ०१/०६/१९८० रोजी मौजे ओझर खुर्द ता. जामनेर** येथे अर्जदाराचे मुळ गावी झालेला आहे. परंतू अर्जदाराचे बहीणीचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला करण्याचे राहून गेलेले आहे.[२]असे असतांना, अर्जदाराजवळ त्यांचे बहीणीचे जन्माचे नोंद हवी असल्याने अर्जदार यांनी त्यांचे बहीणीचे जन्माची नोंद म. ग्रामसेवक तथा निबंधक साो. ग्रामपंचायत कार्यालय ओझर खुर्द ता. जामनेर यांचेकडे मागणी केली असता त्यांनी **सन १९८० चे जन्म नोंद दप्तरमध्ये अर्जदाराचे बहीणीचे जन्माची** नोंदचा शोध घेतला असता अर्जदार यांचे जन्माची नोंद अढळ होत नाही, **असा दाखला दि.१३/०२/२०२४ रोजी दिला आहे.** त्यामुळे जन्माची नोंद होवून तसा जन्म दाखला मिळणेसाठी जामनेर तहसिल ऑफीस मधून जन्माची नोंद करणेबाबतचा आदेश आल्याशिवाय आम्हांला नोंद करता येणार नाही असे सांगितले म्हणून अर्जदारास त्यांचे बहीणीचे जन्माची नोंद करणेबाबतचा आदेश होणेसाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे.[३]त्याअर्थी उपरोक्त किरकोळ अर्जाचे कामी अर्जदाराचे बहीणीचा जन्म मौजे ओझर खुर्द ता. जामनेर जि. जळगाव येथे झालेला आहे. याबाबत कोणाचीही हरकत असल्यास किंवा काही म्हणणे असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात **दि. २८/०५/२०२४ रोजी** प्रत्यक्ष जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. जर कोणताही पुरावा मे. कोर्टासमोर न आल्यास अर्जदाराचे मुलीचे जन्मा नोंद करणेबाबत योग्य ते आदेश करतील आज दिनांक **२४/३/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार जामनेर**
**ता. जामनेर जि. जळगाव**

# लोकारोग्य

# मानसिक आजार आणि उपचार

*निसर्गनियमाप्रमाणे 'व्यक्ती तितक्या प्रकृती ' हे वाक्य सर्वश्रुत आहे . जन्मापासून ते अगदी ~~मरेपर्यंत~~ प्रत्येक व्यक्ती ला कोणत्या ना कोणत्या आजाराने किंवा शारीरिक व्याधीने पछाडलेले असतेच . हे आजार शारीरिक स्वरूपाचे असतात आणि काही ऋतुमान बदलानुसार होणारे विषाणूजन्य तर काही संसर्ग जन्य स्वरूपाचे असतात . अर्थातच या आजारांवर विविध प्रकारच्या ऍलोपॅथिक ,होमिओपॅथिक आणि नैसर्गिक पद्धतीच्या उपचार पद्धती देखील उपलब्ध असतात . परंतु अशा प्रकारच्या शारीरिक आजारावर नियंत्रण ठेवणं सहज शक्य असत . मात्र ,बदलती जीवनशैली ,ताण तणाव ग्रस्त दिनक्रम ,अनेक प्रकारचे कौटुंबिक ,सामाजिक ,आर्थिक प्रकारचे तणाव आणि त्याचाच मानवी मनावर होणार विपरीत परिणाम आणि त्यातून जडणारे अनेक प्रकारचे मानसिक आजार . अनेकदा मानसिक आजाराकडे गांभीर्याने बघितलं नाही तर मनुष्य आपले मानसिक संतुलन देखील हरवून बसतो . म्हणूनच ,मानसिक आजारावर वेळीच उपचार होणं गरजेचं असत . मुळात ,मानसिक आजार म्हणजे नेमकं काय ?या आजाराची कारण काय असतात ?लक्षण काय असतात ?आणि मानसिक आजरावर नेमके उपचार काय करायचे ?हेच जाणून घेण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञ डॉ . आयुष्य पांडे यांच्याशी केलेली बातचीत .*

### १.मानसिक आजार म्हणजे नेमका कोणता आजार ?






सर्वसाधारण पणे मनुष्य हा एकमेकांशी संवाद साधणारा प्राणी आहे . अर्थात ,जगण्यासाठीच्या त्याच्या इतर प्राण्यांप्रमाणेच काही मूलभूत गरजा देखील आहेत . आपल्या दैनंदिन आयुष्यात मनुष्य हा चाकोरीबद्ध अशा सामाजिक चौकटीत आपली रुटीन जीवनशैली जगत असतो . परंतु अनेकदा काही धक्कादायक गोष्टी अशा घडतात किंवा अशा काही कौटुंबिक किंवा सामाजिक गोष्टीमुळे त्याच्या मनावर प्रचंड आघात होतो आणि ताण पडतो . अशा वेळी त्याच्या मेंदूवरील नियंत्रण सुटल्याने असा मनुष्य नेहमीच्या जगण्यापेक्षा विचित्र पद्धतीने वर्तन करू लागतो . एकांतात बसने ,कुणाशीही संवाद न साधने ,काहीतरी विचित्र असे बडबडने ,स्वतःचे स्वतःला भान नसणे .मधेच तोल सुटणे असे वर्तन म्हणजेच असा मनुष्य हा मानसिक आजाराने ग्रस्त आहे असे समजावे . मनावरील ताणाचे मेंदूरूपी नियंत्रण कक्षात झालेले परिवर्तन आणि सुटलेले संतुलन म्हणजेच मानसिक आजार .

### २.मानसिक आजाराची लक्षण नेमकी काय असतात ?

मानसिक आजाराने त्रस्त असलेला मनुष्य सतत चिंतेत असतो . त्याला करिअर ,पैसे ,आरोग्य इत्यादी चिंता सतत सतावत असतात म्हणूनच अशा मनुष्याला निद्रानाश विकार जडतो . झोप लागत नाही . त्यांच्या डोक्यामध्ये ,स्नायूंमध्ये आणि अंगात सतत वेदना होतात . अशा व्यक्तीला कोलाहल सहन होत नाही . सतत मळमळते आणि चक्कर आल्याचा भास होतो . मनात खूप काही साचलेले असते टायचा निचरा न झाल्याने अस्वस्थ वाटते . रिकामेपणाची भावना ,खूप भूक लागणे ,मनात आत्महत्येचे विचार डोकावणे हि सगळी मानसिक आजाराची लक्षण आहेत .



### ३.स्किझोप्फ्रोनिया या आजराची लक्षण काय असतात ?

स्क्रिझोफोनिया या आजाराची लक्षण पुरुषांमध्ये साधारणतः विशीं नंतर आणि महिलांमध्ये विशी नंतर तिशीपर्यंत दिसतात . हा आजरा पुरुष आणि महिलांमध्ये सारखाच असतो . पुरुष आणि स्त्रियांमध्ये या आजाराची संपूर्ण मनोविकृती लक्षण दिसण्याअगोदर पोड्रोमल अवधी सुरु होते हि लक्षण काही हफ्ते किंवा महिने दिसतात . वर्तनात बदल ,समाजापासून दूर राहणे ,लक्ष केंद्रित करताना त्रास होणे ,खूप राग येणे ,झोप न लागणे अशा प्रकारची लक्षण दिसतात . अनेकदा या आजारात उगीचच भ्रम किंवा आभास भासतो ,काल्पनिक गोष्टींचा भास होतो ,मनुष्य अनेक तास स्वतःमध्येच मग्न राहतो . एखादा निर्णय घेताना तो न घेण्याची वृत्ती वाढते . विस्मरण होणे ,नेहमीच्या गोष्टींचा विसर पडणे अशा प्रकारची लक्षण दिसतात .

### ४.मानसिक आजारावर उपचार नेमके काय आहेत ?

मानसिक आजारावर सर्वात उत्तम उपचार म्हणजे ऑनलाईन मूल्यांकन करून घेणे . एखाद्याला मानसिक आजाराने ग्रासले आहे किंवा नाही ?हे तपासण्यासाठी ऑनलाईन मूल्यांकन फार महत्वाचे ठरते . हे मूल्यांकन झाले कि त्या प्रकारे ऑनलाईन उपचार सुचविले जातात . मानसिक आजारावरील उपचार मनोचिकित्सा किंवा समुपदेशनाद्वारे देखील साध्य केले जाऊ शकतात . मानसिक आजार बरे करण्यासाठी हि एक मूलभूत पद्धत आहे . यामध्ये ठराविक टोक थेरेपी पद्धतीमध्ये द्वंद्वात्मक वर्तन किंवा सद्न्यात्मक वर्तणूक थेरेपीचा समावेश होतो . मानसिक विकारासाठी प्रिस्किप्शन औषधे हि एक आणखी एक सामान्य उपचार पद्धत आहे एखाद्या मानसिक विकाराने त्रस्त व्यक्तीच्या लक्षणानुसार त्याला डॉकटर औषध लिहून देतात . याबरोरबरच मैत्री ,योगा ,स्ट्रेचिंग ,नृत्य ,गायन ,लेखन स्पर्धांमध्ये सहभाग ,असे उपचार देखील करता येतात . अगदीच गरज असेल तर रुग्णाला रुग्णालयात दाखल करून त्यावर तज्ज्ञ मानसोपचार डॉक्टर्स उपचार करतात .

# गर्भ शस्त्रक्रिया आणि मूत्रसंस्थेसंबंधीत शस्त्रक्रियेवर परिषद संपन्न

*गर्भाच्या शस्त्रक्रियेची मागणी ही चिंतेची बाब ठरत असून ५,००० पैकी अंदाजे ~~५~~ गर्भास याची आवश्यकता भासते. स्पाइना बिफिडा, मानेचा आकार मोठा असलेले बाळ, मूत्रमार्गात अडथळे आणि काही ट्यूमर यांसारख्या परिस्थिती गर्भाच्या विकासावर विपरित परिणाम करतात. भविष्यातील हानी टाळण्यासाठी वेळीच उपचार करणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस या प्रकरणांची वाढती संख्या पाहता मुंबईतील लीलावती हॉस्पिटल, स्पायना बिफिडा फाउंडेशन आणि पोलंडच्या द मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसियाच्या संयुक्त विद्यमाने गर्भाच्या शस्त्रक्रिया (फिटल सर्जरी) विभागाचे उद्घाटन केले आहे, ज्याचे उद्दिष्ट गर्भातील जन्मजात दोष आणि गर्भाच्या आरोग्याची स्थिती सुधारणे हे आहे. २२, २३ आणि २४ मार्च २०२४ रोजी गर्भ शस्त्रक्रिया आणि मूत्रसंस्थेसंबंधीत शस्त्रक्रियेच्या तीन दिवसीय परिषदेचे आयोजन मुंबईत करण्यात आले होते . भारतात भ्रूण शस्त्रक्रियेच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी ही ३ दिवसीय भ्रूण शस्त्रक्रिया आणि मूत्रसंसर्ग शस्त्रक्रिया परिषद आयोजित करण्यात आली होती .*



या परिषदेत जगभरातील नामांकीत तज्ञ, अभ्यासक आणि संशोधक भारतातील गर्भ शस्त्रक्रिया आणि त्याच्या विकासाच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी एकत्र आले होते . मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. संतोष करमरकर(एफएसयुआय परिषद २०२४ चे अध्यक्ष आणि लीलावती रुग्णालयातील बालरोग शल्यचिकित्सक), पोलंडमधील गर्भ शल्यचिकित्सक डॉ. एग्निएस्का पास्तुस्का आणि एफओजीएसआय चे अध्यक्ष डॉ. तांदुळवाडकर यांचा समावेश आहे.या परिषदेचे उद्घाटन श्री प्रशांत मेहता (विश्वस्त-लिलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्ट)यांचा सहभाग होता .

गर्भाच्या शस्त्रक्रियेमध्ये गर्भधारणेदरम्यान गर्भावर शस्त्रक्रिया केली जाते ज्याचा उद्देश जन्मजात दोष असलेल्या मुलांना योग्य उपचार मिळावे जेणेकरुन त्यांना जन्मानंतरच्या गुंतागुत टाळता येऊ शकते. वेळीच उपचार न झाल्यास भविष्यात आरोग्यासंबंधी गुंतागुंत, अपंगत्व किंवा मृत्यू ओढावू शकतो. स्पायना बिफिडा आणि गर्भाच्या मूत्रमार्गातील अडथळे यांसारख्या परिस्थितीत गर्भाची शस्त्रक्रिया करुन विकसनशील अवयवांना नुकसान होण्याचा धोका कमी करते, ज्यामुळे अर्भकांसाठी भविष्यात चांगले आयुष्य मिळते.या परिषदेमध्ये भ्रूण शस्त्रक्रियेच्या क्षेत्रातील नवीन सर्जिकल तंत्रे आणि प्रगती याविषयी यावर चर्चा करण्यात आली आहे. ज्यामध्ये युरोप आणि यूएसए मधील गर्भ शल्यचिकित्सकाकडूनही मार्गदर्श केले जाईल. सखोल चर्चा आणि चित्रफितींद्वारे सर्जरी तंत्र आणि गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यासारख्या विषयांवर चर्चा करण्यात आली .

# भिजवलेले बदाम खाण्याचे फायदे!

बदामामध्ये असे गुणधर्म असतात जे शरीराला थंड आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात. ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत आणि पोटाशी संबंधित आजारांपासून संरक्षण करतात.उन्हाळ्याच्या कडक उन्हात अनेकदा लोकांना पोटदुखीचा त्रास होतो, ज्यामुळे त्यांना खूप त्रास होतो. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी जर तुम्ही रिकाम्या पोटी १२ ते २० भिजवलेले बदाम खाल्ले तर तुम्हाला शरीराचे आरोग्य चांगले मिळू शकते. बदामामध्ये असे गुणधर्म असतात जे शरीराला थंड आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात. ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत आणि पोटाशी संबंधित आजारांपासून संरक्षण करतात. बदामामध्ये व्हिटॅमिन ई आणि ए जास्त प्रमाणात असते. व्हिटॅमिन ई त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करते तर व्हिटॅमिन ए त्वचेतील कोलेजन वाढविण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचा थंड आणि चमकदार होते.बदामामध्ये लहान पोषक घटक असतात जे पचनशक्ती मजबूत करतात. हे जळजळ आणि सिडिटीपासून मुक्त करते आणि पोटाच्या समस्यांपासून आपले संरक्षण करते.बदामामध्ये एक प्रकारचे विशेष प्रथिने असतात जे मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यामुळे मधुमेह असलेले लोक आपल्या रोजच्या आहारात बदामाचा समावेश करू शकताबदाम खाल्ल्याने तुमचे वजन कमी होते. यात उच्च प्रथिने असतात जे आपल्याला भूक कमी करण्यास मदत



करतात:बदामामध्ये सामान्यत: नायट्रोजन असते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असते. हे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य सुधारण्यास मदत करते.




संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com


# तुका आकाशाएवढा

**सर्वसामान्य व्यक्तीं सारखे, चार चौघांसारखे संसारात लाभ हानी स्वीकारणारे संत श्रेष्ठ तुकोबाराय वयाच्या एकविसाव्या वर्षी भक्तिमार्गाकडे वळले व वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी सदेह वैकुंठवासी झाले. म्हणजे त्यांचा पारमार्थिक संवेग किती तीव्र होता याची खरोखरच कमाल वाटते. त्यांनी 'देव' आपलासा करून घेतला व अंधश्रद्धा, अज्ञान, दांभिकता यावर आपल्या गाथेतून निषेध नोंदविला व भक्तीचे मर्म समजून, प्रपंचात राहून नामस्मरणाचा व ध्यानाचा अभ्यास करा असा उपदेशही केला. त्यामुळे या जगत् वंद्य जगद्गुरु असलेल्या महान संतापुढे नतमस्तक होण्याखेरीज अन्य कोणताही पर्याय राहतच नाही. काल झालेल्या फाल्गुन कृष्ण द्वादशी सत्ताविस मार्च 'तुकाराम बीज'. निमित्त महाराजांना त्रिवार वंदन व त्यांच्या केवळ दोन अभंगांचे प्रकट चिंतन.**

---

आपल्या सुंदर वास्तुत अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी आपण संग्रहित ठेवतो. आपली ती स्वाभाविक इच्छा असते. तसेच एक 'तुकारामांची अभंग गाथा' आपल्या वास्तुत आवर्जून हवी. त्यातील एक अभंग तरी आपण वाचावा, समजून घ्यावा. त्यावर चिंतन करावे त्यातून जो लाभ होईल तो अलभ्य असा असणार आहे. कारण,

**''करितो कवित्व म्हणाल कोणी''**
**''नव्हे माझी वाणी पदरीचीख''**
**''माझिया युक्तीचा नव्हे हा प्रकार''**
**''मज विश्वंभर बोलविंतो ख''**

प्रत्यक्ष विश्वंभरच बोलतोय अशी प्रामाणिक व प्रांजल कबुली संत तुकाराम महाराज यांनी दिली. त्यांच्या वाणीतून जे शब्द आकाराला आले ते केवळ अभंग म्हणून नाही तर त्रिकाल बाधित सत्य ठरले. प्रत्येक अभंग हा तर्कशुद्ध, शास्त्रशुद्ध, प्रामाणिक आत्मपरीक्षणातून साकार झालेला आहे. एखादी विज्ञानाची प्रयोग वही पाहिली तर त्यात प्रयोग असतो. प्रात्यक्षिक, साहित्य, कृती व नंतर अनुमान निघते. अगदी या सर्व स्तरावर तुकारामांचे अभंग आपण पडताळून पाहू शकतो कारण त्यांनी प्रत्यक्ष प्रयोग केलेला आहे. भक्ती मार्गावर चालता चालता त्यांनी जे साधन केले ते अतिशय निष्ठेने, श्रद्धेने व शुद्ध हेतू ठेवूनच. गाथेतील मंगला चरणातील पहिलाच अभंग असा आहे.

**'' समचरण दृष्टी विटेवरी साजरी''**
**''तेथे माझी वृत्ती राहो ख''**
**''आणिक न लगे मायिक पदार्थ''**
**''तेथे माझे आर्त नको देवा ख''**

पंढरीनाथांना तुकोबाराय विनवणी करीत आहेत की माझी व्यथा, काळजी, चिंता याचा भार मला नको. माझा भाव तुझ्या समचरणावर एकनिष्ठ राहू दे. चातक जसा आपली चोच उघडी ठेवून पाण्याचा वर्षाव कधी होईल याचीच वाट पहात राहतो. मेघातून वृष्टी होईल तेव्हाच तो जल घेतो किंवा धेनु जशी आपल्या बालकालाच जवळ करते. सूर्यविकाशीनी चंद्रामृताची वाट पाहत नाही. पाण्याला जाणारी गुजरी हंड्याकडे लक्ष ठेवून रोज पाणी आणते. तसेच पंढरीराया माझे मन तुझ्या चरणा जवळच राहो अन्य कशाचीही अभिलाषा न करो.

याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक संतश्रेष्ठ तुकोबारायांनी केले. भगवंताचे नाम व ध्यान त्यांनी प्राणाबरोबर सांभाळले. याशिवाय एकादशी व्रत करणे, संतांचे अभंग विश्वासाने पाठ करणे, सदाचरण करणे, परनिंदा न करणे, परस्त्री अभिलाषा व परद्रव्य अभिलाषा तिन्ही गोष्टी सर्वथैव त्याज्य म्हणून कटाक्षाने सांभाळल्या व त्यांची वृत्ती समचरणावर विठुरायाच्या कायमच राहिली व यातूनच त्यांनी अवलोकन केले व सहज ध्यानात आले की पंढरीनाथ आता प्रेमाने आपलासा झाला आहे तो जगाचा नियंता आहे. दयाळू आहे. भक्ताचे कोड पुरविणारा आहे व कळी काळालाही धाक दाखवणारा आहे. जन्मोजन्मीचे पुण्य फळास आले व लाभ झाला. निखळ सुख, आनंद, समाधान हे प्रपंचात कमी अनुभवण्यास येते. ते केवळ विठूचरणाशीच संभवते.



इथ मूल्यांकन होते ते 'शुद्ध सात्विक भावाचे' अनेक वेळा तुकोबा राय म्हणतात, येथे भाव प्रमाण आहे बाकी सारे गौण आहे. गाथा वाचताना भाव ठेवूनच वाचायला हवी तरच त्यातील स्पंदन आपण तरल मनात टिपू शकतो व स्वीकारू शकू. गाथेतील प्रत्येक अभंग आपल्याला जवळचा वाटेल कारण प्रत्येक अभंग ''स्वप्रचितीचा आहे. ''बोलू ऐसे बोल ख जेणे बोले विठ्ठल डोलेख'' जणू प्रत्येक अभंगाला विठुरायाने मान डोलावली आहे व प्रतिसाद दिलाय. ओतोप्रत भरून राहिलेले सावळे परब्रह्म जणू बोलत आहे. हे सारे अभंग म्हणजे देव भक्ताचा सुख संवाद आहे जणू गुजगोष्टी एकमेकांशी करत आहेत असे वाटते. इतकी ताकद व सामर्थ्य या अभंगात आहे.

प्रपंचाचे स्वरूप चिंता, व्यथा, काळजी असे असतेच. 'रात्रंदिन आंम्हा युद्धाचा प्रसंग' हे तर खरेच. पण दात येण्यापासून दात पडेपर्यंत हा प्रवास सुरूच असतो. कोणीही येथे अपवाद नसतो. म्हणून विठ्ठलाचा ध्यास घेतलेले तुकोबारायांना वेगळी अनुभूती आली. जीवनाची परिणीती सार्थकतेत झाली व अनुमान निघाले की,

**''याचसाठी केला होता अट्टाहास''**
**''शेवटचा दिवस गोड व्हावा''**
**''आता निश्चिंतिने पावलो विसावा''**
**''खुंटलिया धावा तृष्णेच्या''**

बोधाच्या प्रांतातील परमोच्च पद प्रकट करणारा व जनमानसाला अपेक्षित मार्गदर्शन करणारा हा पराकोटीचा स्वप्रचितीचा हा अभंग आहे. कर्म करण्याचे हातोटी व कौशल्य समजून घेऊन व भक्तीचे वर्म समजून घेऊन आपण उपासना केली तर आयुष्याच्या सायंकाळी शांती, तृप्ती, आनंद, कृतार्थता याची थोडी चुणूक आपणही अनुभवू शकु.

संतश्रेष्ठ तुकोबाराय या अभंगात स्पष्ट कबुली देतात, आता तृष्णा राहिली नाही. हवे-नको पण संपले. मन निश्चिंत आहे. दिवस खेळीमेळीत चालले आहे आणि यासाठीच आम्ही आयुष्यभर प्रयत्न केला. पण तो लाभ मात्र खचितच आम्हाला झाला.

अलीकडे आपल्याही वाचण्यात, ऐकण्यात, बोलण्यात येते की साठी नंतर मिळालेले आयुष्य ग्रेस गुणांसारखे असते ते विना तक्रार आनंदात घालवावे. पण यासाठी 'आनंदाचा झरा' आपल्या आतच आहे हे उमगावे लागते. तसा प्रयत्न तरुणपणापासून व्हावा लागतो. आपण शिक्षण, पद, पैसा, प्रतिष्ठा, लोकसंग्रह हे जसे कमावतो तसेच समाधान व आनंद कमवावेच लागतात. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत तुकोबारायांनी 'आनंदाच्या कोटी साठविल्या आम्हा पोटी' हे अनुभवले.

थोडा प्रयत्न आनंदनिर्भर होण्याचा आपण करूया. यासाठी गाथेतील एक अभंग चिंतन करून वर्तन करावा. ''समजले आणि वर्तले तेची एक भाग्यपुरुष जाहले'' असे समर्थवचन आहेच. असे भाग्यपुरुष होण्याचा अभ्यास व्हावा. सर्व संतांचे आशीर्वाद व ताकद आपल्या पाठीशी आहे. तुकाराम बीज निमित्त आजही फार मोठा अवर्णनीय सोहळा देहूत संपन्न होतो. लाखोंचा भक्त समुदाय तेथे उपस्थित राहतो.

**''येता निजधाम कोणी'' ''विठ्ठल विठ्ठल म्हणा वाणी''**

अतिशय तळमळीने व करूणेने व प्रेमळ अंत:करणाने संतश्रेष्ठ तुकोबाराय आपल्याला सांगून गेले. अशा कोणीतला आपणही एक होण्याचा प्रयत्न करूया. अतिशय प्रेमाने व लडिवाळपणे तुकोबाराय आपला सांभाळ केल्याशिवाय राहणार नाही.

*** जय जय विठोबा रखुमाई ***




भाग्यरेखा पाटोळे
कोथरूड, पुणे
मो. ८४१२९२६२६९


# अग्रवाल समाजाचा फाग उत्सव उत्साहात


लोकशाही न्यूज नेटवर्क
रावेर प्रतिनिधी


वृदांवन व मथुरा धाम येथील होळी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील अग्रवाल समाजाच्यावतीने लठ्ठमार व लड्डूमार होळी फाग उत्सव जोरदार साजरा केला. अग्रसेन भवन येथे लठ्ठमार व लड्डू मार होळी फाग उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे नियोजन संगीता संजय अग्रवाल यांनी केले होते.

सूत्र संचालन प्रिया अतुल अग्रवाल यांनी केले. यावेळी उपस्थित महिला व पुरुष समाजबांधवानी भजने सादर केली. यात श्वेता राजेश अग्रवाल यांनी कृष्णाची व पूनम विशाल अग्रवाल यांनी राधेची वेशभूषा परिधान केली होती. तसेच नमामि अग्रवाल, श्रद्धा अग्रवाल, यांनी मयूर नृत्य सदरीकरण केले. यावेळी समाजातील महिलांनी विविध प्रकारची वेशभूषा केली होती.

या कार्यक्रमाला संपूर्ण अग्रवाल समाजातील महिला पुरुष मंडळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अग्रवाल समाजाचे अध्यक्ष संजय अग्रवाल, सचिव राजेश अग्रवाल, उपाध्यक्ष संतोष अग्रवाल, कोषाध्यक्ष गोविंद अग्रवाल, विश्वस्त अनिल मालेगांवकर, जयप्रकाश अग्रवाल, ज्योती गोविंद अग्रवाल, मोनिका संतोष अग्रवाल यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आनंद घेण्यात आला.






# लोकोत्सव



दैनिक लोकशाही
epaper.lokshahilive.com
जळगाव, गुरुवार दि.२८ मार्च २०२४


## हे माहित आहे का?

## कशी पार पडली पहिली निवडणूक?




आज निवडणुकीची, मतदानाची प्रक्रिया आपल्या अंगवळणी पडली आहे. पण देशात लोकसभेची पहिली निवडणूक कशी पार पडली होती? देशाला स्वातंत्र्य मिळाले १९४७ मध्ये, पण पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली १९५२ मध्ये. या पहिल्या निवडणुकीकडे जगभराचे लक्ष लागलेले होते.

नुकतेच स्वातंत्र्य मिळून लोकशाही अंगिकारलेला एवढा मोठा देश निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे हाताळू शकेल का याचीच शंका सगळ्यांच्या मनात होती. सगळ्यांच्या मनातल्या शंका-कुशंका बाद करत भारताने पहिली निवडणूक यशस्वी करून दाखवलीच, पण त्याबरोबर काही ऐतिहासिक पावलेही उचलली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दोनच वर्षांत भारतात निवडणूक आयोग नेमला गेला. मार्च १९५० मध्ये सुकुमान सेन यांची भारताचे पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक झाली.

दोनच वर्षांत लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकत्रितपणे घेण्यात आल्या. सेन यांनी त्याची सगळी जबाबदारी घेतली. सज्ञान व्यक्तीस मताधिकार या आधारावर निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला. वयाची २१ वर्षं पूर्ण करणाऱ्या सगळ्या नागरिकांना मताधिकार मिळाला. स्वयंघोषित विकसित देशांपैकी अनेक ठिकाणी त्या वेळी मत देण्याचा अधिकार केवळ मातब्बर लोकांना होता. महिला, कामगार मताधिकारापासून वंचित होते. पण भारतात सर्वांना मताधिकार मिळाला.

## बोल नेत्यांचे....



मनसेने तीन जागांचा प्रस्ताव महायुतीसमोर दिला आहे. लोकसभेला मनसे तीन जागा लढवण्यास इच्छुक आहे असे महायुतीला राज ठाकरेंनी सांगितले होते. त्यावर चर्चा सुरु होती. आता आम्ही दोन जागा मागितल्या आहेत. यावर राज ठाकरे आणि भाजपात चर्चा सुरु आहे. त्या जागा नेमक्या कुठल्या आहेत हे राज ठाकरे सांगू शकतील. योग्य तो निर्णय पक्षप्रमुख राज ठाकरे घेतील.

**– बाळा नांदगावकर**
**नेते, मनसे**



भारताचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात होत आहे, असा विश्वास निर्माण करून त्याची मोठ्या प्रमाणात जाहीरात करण्यात येत आहे. अशी जाहीरात करून भारत सर्वात मोठी चूक करत आहे. सर्वप्रथम भारताला महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करावे लागेल, त्यानंतरच भारत शाश्वत विकासाच्या दृष्टीने पुढे जाऊ शकतो. लोकसभा निवडणुकीनंतर ज्या पक्षाचे सरकार येईल, त्यांना सर्वप्रथम आपल्या देशातील मनुष्यबळाचे शिक्षण आणि कौशल्य विकास यावर काम करावे लागेल. हे जर केले नाही, तर भारताला आपल्या तरूण लोकसंख्येचा काहीही लाभ होणार नाही.

**– रघुराम राजन,**
**भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर**




महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या ठाकरे गटाने लोकसभेसाठी पहिली यादी जाहीर केली आहे. या पहिल्या यादीत १७ उमेदवारी जाहीर केले आहेत. या यादीमध्ये ज्या जागांवर काँग्रेस पक्षही आग्रही होता, तिथेही ठाकरे गटाने उमेदवारी जाहीर केली आहे. काँग्रेसने दावा केलेल्या सांगली लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाने उमेदवार दिला असल्याने महाविकास आघाडीत अंतर्गत नाराजी निर्माण झाली आहे.

**– चंद्रहार पाटील,**
**शिवसेनेचे उमेदवार**



रासपचे नेते महादेव जानकर महायुतीमध्ये आल्यानंतर त्यांना अजित पवार गट पाठिंबा देणार, बारामतीचा उमेदवार बदलणार हे खोटे आहे. राष्ट्रवादीने महादेव जानकरांना पाठिंबा दिला ही विरोधकांनी पसरवलेली अफवा असून बारामतीचा उमेदवार बदलणार नाही.

**– अजित पवार,**
**उपमुख्यमंत्री**



शिवसेना उबाठा गटाने लोकसभेच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर वंचित बहुजन आघाडीनेही नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली. प्रकाश आंबेडकर यांना आम्ही अकोल्यासह चार जागा देण्यास तयार झालोच होतो. आज जर चर्चा पुढे गेली असती तर सहावी जागाही कदाचित त्यांना दिली असती. हे आम्ही तीन पक्षांनी ठरवले होते. काहीही झाले तरी प्रकाश आंबेडकर यांना बरोबर घेण्याचे आम्ही ठरविले होते.

**– संजय राऊत,**
**नेते शिवसेने (उबाठा)**

# शनिवारपासून भाजप फुंकणार निवडणुकीचे रणशिंग

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली ✍ प्रतिनिधी**

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची मेरठमध्ये मोठी रॅली



भारतीय जनता पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सर्वाधिक जागा असलेले राज्य उत्तर प्रदेशातून आपल्या निवडणूक प्रचाराची सुरूवात करत आहे. याची सुरूवात शनिवार दि. ३० मार्चपासून होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मेरठ येथून एक मोठी रॅली काढून याची सुरूवात करतील. यादरम्यान जयंत चौधरीही त्यांच्यासोबत असतील. भाजपाने मेरठ लोकसभा मतदार संघातून अरूण गोविल यांना तिकीट दिले आहे.

भाजपने उत्तर प्रदेशातील ६४ जागांवर आपल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यात २४ मार्चला पक्षाने राज्यातील १३ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. येथे माजी केंद्रीय मंत्री मेनका गांधी यांना सुल्तानपूर येथून पुन्हा संधी मिळाली आहे. त्यांचे सुपुत्र आणि पिलभीतचे खासदार वरूण गांधी यांचे तिकीट कापण्यात आले आहे. त्यांच्या जागी जितीन प्रसाद यांना मैदानात उतरवण्यात आले आहे.

भाजपने पाचव्या यादीत उत्तर प्रदेशातील एकूण १३ उमेदवार घोषित केले होते. यात पक्षाने आपल्या ९ सध्याच्या खासदारांना संधी दिली नाही. पक्षाने ज्या नऊ खासदारांचे तिकीट कापले त्यात गाझियाबादचे खासदार वीके सिंह, पिलभीतचे खासदार वरूण गांधी, बरेलीचे खासदार संतोष गंगवार, कानपूरचे सत्यदेव पचौरी, बदायूंचे माजी मंत्री स्वामी प्रसाद मौर्या यांची सुपुत्री डॉक्टर संघमित्रा मौर्य, बाराबंकी येथून उपेंद्र सिंह रावत, हाथरस येथून राजवीर सिंह दिलेर, बहराईच येथून अक्षयवर लाल गौड आणि मेरठचे खासदार राजेंद्र अग्रवाल यांचा समावेश आहे.

### रॅलीने होणार प्रचाराचा शुभारंभ

भारतीय जनता पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सर्वाधिक जागा असलेल्या उत्तर प्रदेशातून पंतप्रधान मोदी हे निवडणूक प्रचाराची सुरूवात करीत असून मेरठमधून यावेळी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या रॅलीत सहभागी व्हावे यासाठी भाजपतर्फे नियोजन सुरु आहे.

# तिकीट जाहीर पण आले ईडीचे समन्स

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई ✍ प्रतिनिधी**

### ठाकरे गटाचे उमेदवार अडचणीत

देशासह राज्यात लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू असताना घडामोडींना वेग आला आहे. ठाकरे गटाचे लोकसभेचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांना ईडीचे समन्स आले आहे. अमोल किर्तीकर यांना खिचडी घोटाळ्यात ईडीने समन्स पाठवले आहेत. अमोल कीर्तिकर यांना हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. खिचडी गैरव्यवहार प्रकरणात चौकशी होणार असल्याची माहिती मिळत आहे. अमोल किर्तीकर उत्तर पश्चिम मधून लोकसभेचे उमेदवार आहेत.

दरम्यान अमोल कीर्तिकर यांना ईडी कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्याचा समन्स बजावण्यात आला आहे. या ईडीच्या समन्समुळे अमोल कीर्तिकरांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कोरोना काळात झालेल्या खिचडी घोटाळ्याप्रकरणी कीर्तिकरांना ईडीने समन्स बजावले आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी हे समन्स देण्यात आले आहे. खिचडी घोटाळ्यात सूरज चव्हाण यांच्यासोबत अमोल कीर्तिकर यांचे नाव समोर आले होते. याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने चौकशी केली होती. त्यानंतर आता ईडीने समन्स पाठवून चौकशीला बोलवले आहे.

### भारत जोडो यात्रेवरुन फडणवीसांचा गांधींवर हल्लाबोल

# राहुल गेले तिथेच काँग्रेस फुटली!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चंद्रपूर ✍ प्रतिनिधी**



राहुल गांधी हे यात्रा घेऊन निघाले. ते जिथे-जिथे गेले, तिथे-तिथे काँग्रेस फुटली-तुटली. लोक सोडून गेले आणि त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. यंदाची लोकसभा निवडणूक म्हणजे नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी असा लढा आहे. ही निवडणूक देशात मोदींचे राज्य आणायचे की राहुल गांधींना संधी द्यायची याचा निर्णय करणारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी चंद्रपूरच्या गांधी चौकात जाहीर सभा झाली. यावेळी फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार, खासदार तथा वर्ध्याचे उमेदवार रामदास तडस, आमदार संजीव रेड्डी बोदकुलवार, आमदार अशोक उईके, आमदार संदीप धुर्वे, आमदार महेश बालादी, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार संजय धोटे, माजी आमदार आशिष देशमुख, भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगर अध्यक्ष राहुल पावडे, ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे, माजी महापौर राखी कंचर्लावार, सुदर्शन निमकर यांच्यासह पक्षाचे इतर नेते, पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, देशाचा नेता कोण असेल, देशाचे नेतृत्व कुणाकडे द्यायचे याचा निर्णय प्रत्येकाला करायचा आहे. मुनगंटीवार यांना दिलेले प्रत्येक मत हे मोदींना दिले असणार आहे. मुनगंटीवार यांनी चंद्रपूरच्या सर्वंकष विकासासोबत राज्यातील महत्त्वाचे नेते म्हणून अनेक मुद्द्यांनाही हात घातला आहे. त्यामुळेच महायुतीच्या उमेदवारांचे नामांकन दाखल करण्यास चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून सुरुवात होत होत असल्याचेही सांगितले.

### मोदी, शाह, नड्डा, गडकरी, फडणवीस यांचा समावेश

# भाजपच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली ✍ प्रतिनिधी**



भारतीय जनता पक्षाने तीन राज्यांसाठी आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. या तीनही यादींमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, अध्यक्ष जेपी नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, रस्ते परिवहन आणि राज्य मंत्री नितीन गडकरी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नावांचा समावेश आहे.

संबंधित राज्यांतून अनेक मोठ्या भाजप नेत्यांना स्टार प्रचारक बनवण्यात आले आहे. राज्यातील स्टार प्रचारकांच्या यादीत अशीही नावे आहे जे विधानसभा निवडणुकीत हरले होते आणि सध्याच्या लोकसभा निवडणुकीसाठी त्यांना तिकीटही मिळालेले नाही. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी २५ दिवसांहून कमी वेळ शिल्लक आहे. १९ एप्रिलला देशात लोकसभा निवडणुकीअंतर्गत पहिल्या टप्प्यातील मतदान होत आहे.

भाजपच्या स्टार प्रचारकांमध्ये अनेक अशी नावे आहेत ज्यांना तिकीट तर मिळालेले नाही आहे मात्र या यादीत सामील आहेत. बिहारमधून अश्वनी चौबे स्टार प्रचारकांच्या यादीत सामील आहेत. तर सय्यद शाहनवाज हुसैनही बिहारच्या स्टार प्रचारकांमध्ये आहेत.

### राज्यांचे मुख्यमंत्रीही स्टार प्रचारक

अनेक राज्यांचे मुख्यमंत्रीही स्टार प्रचारकांच्या यादीत सामील आहेत. यात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय, आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही स्टार प्रचारक आहेत.



# भारत राष्ट्र समितीचे अस्तित्वच धोक्यात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**परभणी ✍ प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून के. चंद्रशेखरराव यांच्या 'भारत राष्ट्र समिती'त प्रवेश करणाऱ्यांचा ओघ मोठ्या प्रमाणावर वाढला होता. तेलंगणात जाऊन गळ्यात गुलाबी रुमाल टाकणाऱ्यांमध्ये शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणावर होते. तेलंगणा विधानसभा निवडणुकीत चंद्रशेखर राव यांचा पराभव झाला आणि पक्षात दाखल झालेले मराठवाड्यातले कार्यकर्तेही सैरभैर झाले. या पक्षाच्या शेतकरी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष माणिक कदम यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला आहे. अवघ्या काही महिन्यात 'बीआरएस'चा गुलाबी रंग उडाल्याने काही कार्यकर्त्यांनी वेगळा पर्याय शोधला तर काही अजूनही चाचपडत असल्याचे चित्र आहे. सध्या भारत राष्ट्र समितीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

'शेतमालाला रास्त भाव मिळालाच पाहिजे' अशी मागणी करत विविध शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून चळवळीत कार्य करणाऱ्या शेतकरी संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांना के. चंद्रशेखर राव यांच्या 'भारत राष्ट्र समिती'ची भुरळ पडली होती. शेतकरी संघटनांमध्ये कार्यरत असणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांनी गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात या पक्षात प्रवेश केला. परभणी, हिंगोली, नांदेड हा एकेकाळी शेतकरी संघटनेचा दबदबा असलेला भाग होता. बहुतांश शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी राजकीय पर्याय शोधताना महाराष्ट्रातील प्रस्थापित राजकीय पक्ष सोडून हा पर्याय निवडला. शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना अशा ठिकाणी काम करणाऱ्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी भारत राष्ट्र समिती जवळ केली होती.

# ज्योती मेटेंनी दिला नोकरीचा राजीनामा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**बीड ✍ प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. त्यातच, यंदाच्या निवडणुकीत प्रथमच दोन राष्ट्रवादी, दोन शिवसेना पक्ष एकमेकांविरुद्ध मैदानात उतरल्याने ही लढाई रंगतदार होत आहे. गेल्या ४ वर्षांपासून राजकीय वनवासात असलेल्या पंकजा मुंडेंना भाजपाने लोकसभेच्या रिंगणात उतरवले आहे. बीड लोकसभा मतदारसंघातून प्रीतम मुंडेऐवजी पंकजा मुंडेंना तिकीट देण्यात आले आहे. त्यामुळे, पंकजा मुंडे यांनी समाधान व्यक्त करत प्रचाराचा शुभारंभही केला. दुसरीकडे पंकजा मुंडेंविरुद्ध कोण, असा प्रश्न असतानाच आता ज्योती मेटेंनी निवडणूक लढण्याची घोषणाच केली आहे.

महाविकास आघाडीचे शिल्पकार आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही यंदाच्या निवडणुकीत प्रभावीपणे लक्ष देऊन कंबर कसली आहे. बीड लोकसभा मतदारसंघावरही त्यांनी विशेष लक्ष दिले आहे.

# 'मी पुन्हा येईन'!

**मन की बात**
**दीपक कुलकर्णी**
**९९६०२१०३११**

राजकारणात कधी काय होईल याचा भरवसा राहिलेला नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतांना त्यांनी 'मी पुन्हा येईन' अशी गर्जना केली; ते बहुमतात आलेही मात्र सत्तेपासून त्यांना लांब रहावे लागले. 'केंद्रात नरेंद्र... राज्यात देवेंद्र' अशीही घोषणा त्यावेळी फार चालली मात्र केंद्रात नरेंद्र आले मात्र राज्यात देवेंद्र काही आले नाही. काळ पुढे जात राहिला तसे समीकरण देखील बदलत गेले. अडीच वर्षांनी देवेंद्र आले ते ही दोन पक्ष फोडून... राजकारणातील व्यक्तीला सत्तेशिवाय करमत नाही हे खरे आहे. एकदा राजकारणात पाऊल ठेवले की त्याला खर्ची हवीच असते. आता बघा जळगाव लोकसभा मतदारसंघातही खुर्चीचा ख ॆ ळ सुरु झाला आहे. भाजपने विद्यमान खासदार उन्मेष पाटील यांचा पत्ता कट केला असला तरी ते आपली खुर्ची वाचविण्यासाठी धडपड करीत आहेत. उन्मेष पाटील हे देशातील टॉप टेन खासदारांपैकी एक आहेत. तरीही भाजपने त्यांचा पत्ता कट करण्याची जोखीम पत्कारली आहे. उन्मेष पाटील यांच्याविरोधात पक्षांतर्गत गट अधिक सक्रीय झाल्याने श्रेष्ठींनी त्यांना घरचा रस्ता दाखविला असला तरी उन्मेष पाटील स्वत:ची वाट शोधत आहेत. तत्कालीन खासदार ए.टी. नाना पाटील हेही भाजपपासून असेच दूर गेले असतांनाही त्यांना जवळ घेण्याचा साधा प्रयत्नही भाजपने केला नाही. तोच कित्ता उन्मेष पाटील यांच्याबाबतीत भाजप गिरवित असला तरी त्यात जोखीम जास्त आहे. उन्मेष पाटील यांच्या आमदारकी व खासदारकीच्या काळात बहुतांश कामे मार्गी लागल्यामुळे त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाल्यानेच त्यांना जवळ घेण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे यांची शिवसेना करीत आहेत. प्रत्येक राजकारण्याला स्वत:ला सिद्ध करण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतात तसाच निर्णय उन्मेष पाटीलही घेवू शकतात. भाजपने महिला कार्ड समोर करुन स्मिता वाघ यांना उमेदवारी दिल्याने त्यांच्या विरोधात महिला उमेदवार देण्यावर उद्धव सेनेचा प्रयत्न आहे. हा प्रयत्न करीत असतांना उद्धव सेनेसमोर काही महिलांची नावे समोर असून त्यात उन्मेष पाटील यांच्या पत्नी संपदा यांचेही नाव वरती आहे. अमळनेरच्या ॲड. ललिता पाटील या उमेदवारीसाठी 'मातोश्री'. वर घिरट्या घालत आहेतच. खासदार उन्मेष पाटील हेही राजकारणात मुरब्बी असल्याने ते सावध पाऊले उचलत आहेत. देवेंद्र फडणवीसांप्रमाणे तेही 'पुन्हा येईन' अशी गर्जना करु शकतात. शेवटी काय तर राजकारणात सक्रीय राहण्यासाठी कुठलातरी पक्ष हाताशी ठेवणे गरजेचे आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिंदेंची शिवसेना व अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपच्या खेळीकडे टकामका बघत आहे. त्यांच्यातील काही लोकांचा स्मिता वाघ यांच्या उमेदवारीला विरोध आहे हे लपून राहिलेले नाही मात्र ते समोर येत नाही एवढेच! एकेकाळी निष्ठावंत असल्याची कोल्हेकुई करणारे पदाधिकारी क्षणात सरड्यासारखे रंग बदलवून सोयीस्करपणे पक्षाचा झेंडा हाती घेतात. कार्यकर्त्यांनाही त्यांच्या या पक्ष बदलाचा तिटकारा येतो मात्र कार्यकर्ते बिचारे करणार तरी काय?

एकंदरीत काय तर राजकारणात आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येकाला प्रयत्नांची पराकाष्टा करावीच लागते. कार्यकर्त्यांची फळी आणि व्हिजन डोळ्यासमोर ठेवून निवडणुकांच्या मैदानात उतरावे लागत असून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी 'मी पुन्हा येईन' अशी गर्जनाही करावीच लागते.






हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर – No.JAL/16/2021-23 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १५ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.